
## प्रकरण दुसरे

# कराड नगरपालिकेची स्थापना, विकास व प्रशासन


PROPOSED DEVELOPMENT
PLAN OF KARAD (REVISED)
REFERENCES :-
RESIDENTIAL.
PUBLIC-SEMIPUBLIC.
COMMERCIAL.
TRANSPORT & COMMUNICATION.
ROAD WIDENING OR NEW ROAD PROPOSALS.
INDUSTRIES.
TOWN PLANNING SCHEME KARAD NO I & II.
MUNICIPAL LIMIT
CONGESTED AREA
RIVER KRISHNA
RIVER KOYNA

## प्रकरण दुसरे

# कराड नगरपालिका स्थापना, विकास व प्रशासन

मागील प्रकरणात कराड शहराचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहासाचा थोडक्यात आढावा घेतला. कराड नगरपालिकेची स्थापना ही एक महत्वपूर्ण घटना घडली कारण त्यामुळे कराड नगरीचा सर्वांगीन विकास होण्यास मदत झाली म्हणून या प्रकरणामध्ये कराड नगरपालिकेची स्थापना कशी झाली व पुढील काळात तिच्या विकासात कोणते महत्वाचे टप्पे होऊन गेले याचा थोडक्यात आढावा घेण्याचा नम्र प्रयत्न मी या प्रकरणात केलेला आहे.

१. सन १८५५ ते १८५८

२. सन १८५८ ते १८६७

३. सन १८६७ ते १८७७

४. सन १८७७ ते १८८५

५. सन १८८५ ते १८८९

६. सन १८८९ ते १९१०

७. सन १९१० ते १९२०

८. सन १९२० ते १९२६

९. सन १९२६ ते १९३८

१०. सन १९३८ ते १९४६

११. सन १९४६ ते १९५५

१२. सन १९५५ ते १९९३

**स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास -**

नगरपालिका स्थापना व विकासाचा आढावा घेणेपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास पहाणे क्रमप्राप्त होईल. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे स्वतंत्र राष्ट्राचा एक घटक म्हणून पहावे लागेल. जरी राष्ट्र स्वतंत्र सरकारची स्थापना करीत असले तरी स्थानिक स्वराज्य संस्था किंवा नगरपालिका यातून वगळता येणार नाहीत. टोकवेव्हील यांच्या मताकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. एन. पी. शर्मा सुध्दा या मताला दुजोरा देताना म्हणतात की लोकशाही यशस्वी व्हायची असेल तर स्थानिक स्वराज्य संस्थाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे[१].

**प्राचीन व मध्यकालीन स्थिती -**

स्थानिक स्वराज्य संस्थेचा विचार करता ही कल्पना प्राचीन काळी होती असे दिसून येते. कारण प्राचीन काळी राजाला प्रशासन यंत्रणा चालविण्यासाठी व महत्वाचे निर्णय घेण्यासाठी मंत्री परिषदेचे सहाय्य घ्यावे लागे. मंत्री परिषदेने दिलेले निर्णय हे जरी राजाला बंधनकारक नसले तरी त्या निर्णयाचा आदर करुन योग्य आदेश देण्याचा अलिखित संकेत होता. विशेषतः युध्द किंवा तहाचा निर्णय या पध्दतीने घेतला जात असे. इ. स. पूर्व ३२४ ते ३२० या काळात चंद्रगुप्त मौर्य याच्या दरबारात मंत्री परिषद अस्तित्वात होती. तसेच त्याची राजधानी पाटली पुत्र येथे या नगरीचा कारभार पाहण्यासाठी स्थानिक नगरपालिका कमिटी होती. तीला नगरसभा या नावाने संबोधले जात असे. नगरातील सुखसोई आणि स्थानिक प्रशासन राजाच्या विचाराने पाहात असत. लोकांना नागरी सुविधा पुरविल्यात जात असत. लोककल्याणाची कामे या नगरसभेच्या मार्गदर्शनाखाली केली जात असत. तसेच खेडयातील प्रशासन सुध्दा लोकांच्याकडून पाहिले जात असे. ग्राम प्रशासनामार्फत खेडयातील सुखसोई विषयी अधिक लक्ष पुरवित[२].

त्याच बरोबर शिवाजी राजाच्या काळात अष्टप्रधान मंडळ मधील मंत्र्यांच्या नियंत्रणाखाली प्रशासन व्यवस्था योग्य रितीने राबविली जात होती. कर्नल टोनच्या मते मराठयांचे राज्य म्हणजे लष्करी प्रजसत्ता होय[३].

१७ व्या शतकात ब्रिटिशांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा आढावा घेउन टप्प्याटप्प्याने तीच्या विकासास प्रारंभ केला.

**स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचे टप्पे -**

डॉ. महेश्वरी यांच्यामते भारतामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थाच्या विकासाचे पाच टप्पे सांगितले आहेत. प्रत्येक टप्याचे उद्देश हेतू वेगळे होते[४].

**१. पहिला टप्पा - (१६८७ - १८८१)**

सन १६८७ ला ब्रिटिश सत्ताधिशांनी मद्रास येथे महानगरपालिकेची स्थापना केली याचा मुख्य उद्देश वस्तूवरील जकात कर गोळा करणे हा होता आणि ख-या अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाला आरंभ झाला. परंतु स्थानिक व्यापा-यांनी प्रत्यक्ष कर देणेस नकार दिला. परिणामी हा पहिला प्रयोग अयशस्वी ठरला. पुढे १७२६ मध्ये चार्टर अॅक्ट पास झाला. या कायद्यानुसार मद्रास महानगरपालिकेच्या स्थापनेचा आदेश रद्द करणेत आला व मयोर कोर्टाची स्थापना करणेत आली. त्यांना या कायद्यानुसार प्रशासनापेक्षा न्यायालयीन अधिकार अधिक देणेत आले. याच धरतीवर आधारीत मुंबई व कलकत्ता येथे नवीन कोर्टाची स्थापना करणेत आली[५].

सन १७९३ च्या चार्टर कायद्याच्या भारतीयांना स्थानिक स्वराज्य संस्था देण्यात आल्या. या स्थानिक स्वराज्य संस्थाचा कारभार पाहण्यासाठी जस्टीस ऑफ पीस याची नेमणूक करणेत आली. या जस्टीस ऑफ पीस याची नियुक्ती करणेचे अधिकार गव्हर्नर जनरलला देणेत आले[६].

या प्रमाणे मुंबई, कलकत्ता, मद्रास या तीन शहरामध्ये गव्हर्नर जनरलाकडून तीन अध्यक्षांची नियुक्ती करणेत आली होती. ते शहरातील घरावर जागेवर कर बसवत असत. शहरात शांतता नांदण्यासाठी लागणारी पोलिस यंत्रणा, शहरासाठी लागणा-या इतर सुखसोई पुरविल्या जात असत. सन १८४२ मध्ये बंगाल कायदा पास झाला[७]. या कायद्यानुसार नगरपालिका प्रशासन जिल्हा स्तरापर्यंत जावून पोहचले. शहर पंचायत कमिटीची स्थापना झाली. शहरातील लोकांच्या आरोग्याचे रक्षण हा प्रमुख उद्देश होता. परंतु तेथील स्थानिक रहिवाश्यांनी याला विरोध दर्शविला, कर देण्यास नकार दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासातील आणखी एक महत्वाचा भाग म्हणजे सन १८५० सालचा कायदा होय[८]. हा कायदा पास झाला व या कायद्यानुसार देशांतर्गत म्युनिसिपल बोर्डाची स्थापना झाली. शहरे व मध्यम प्रतीची गावे येथील नागरिकांनी सरकारकडे मागणी केल्यास त्या शहरात किंवा गावात सदर कायद्याखाली नगरपालिकेची तातडीने स्थापना होत असे. १८५० ते १८५५ या अल्पकाळात अनेक लहान मोठया गावातून नगरपालिका अस्तित्वात आल्या. इंग्रज सरकारच्या या नव्या उपक्रमामुळे निदान नागरी जीवनाच्या मर्यादित क्षेत्रात नियंत्रीत लोकशाहीच्या मार्गाने एकत्र येऊन सार्वजनिक कार्य करण्याची व अनुभव घेण्याची संधी नागरिकांना मिळाली.

जनतेचे सहकार्य हे राजसत्तेचे अधिष्ठान आहे हे ओळखून इंग्रज सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थामार्फत मर्यादित लोकशाहीचा प्रयोग आरंभिला. मात्र या प्रयोगातून पुढे मागे होणा-या लोकजागृतीचे परकीय सत्तेवर काय परिणाम होतील याची ही पुरी कल्पना इंग्रज सत्ताधा-यांना असल्यामुळे शासित देशात हा प्रयोग हाताळताना त्यांनी प्रथमपासून सावधगिरी ठेवल्याने स्थानिक स्वराज्य संस्थाच्या प्रगतीची गती अतिशय मंद व अनिश्चित राहिली.

१७२६ व १७४२ च्या कायद्याची फलनिष्पत्तीचा विचार करता त्यांनी या कायद्यात महत्वाचा बदल करुन ऐच्छिक व अप्रत्यक्ष कर योजनेची तरतुद करण्यात आली.

**लॉर्ड मेयोन ने पास केलेला ठराव (१८७०) -**

सन १८६९ ते १८७२ या दरम्यानच भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासात आणखी भर पडली. सन १८७० मध्ये लॉर्ड मेयोने आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव पास केला. या ठरावानुसार आर्थिक विकास व भारतीय लोकांना प्रशासनात सहभागी करुन घेणेसाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. या अगोदर केंद्राकडे एकवटलेली सत्ता प्रांताकडे ही वर्ग करणेत आली. केंद्राकडील काही खाती राज्याकडे सुपूर्त करणेत आली. उदा. शिक्षण-आरोग्य, रस्ते इ. खात्याच्या खर्चासाठी लागणारी आर्थिक तरतुद ही ज्या त्या राज्यानी करातून आर्थिक उभारणी करावी असा ठराव केला.

**दुसरा टप्पा (१८८२ ते १९१९) -**

<u>लॉर्ड रिपनचा सन १८८२ चा ठराव</u> -

लॉर्ड रिपन यांनी १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा पास करुन घेतला. स्थानिक स्वराज्य संस्थेकडे ते लोकशिक्षण व राज्यकारणाचे ठळक हत्यार म्हणून पहात. १८८२ चा ठराव हा स्वराज्य संस्थेच्या कार्यपध्दतीत मुलभूत बदल झालेचे आढळून येते[९]. यामध्ये प्रामुख्याने भारतीय लोकांना राजकारणात सहभागी होता येत होते. राजकारणातील आपले ज्ञान वाढवून प्रशिक्षण मिळणार होते. स्थानिक विकास करणे कामी लोकांच्या कल्पकतेला वाव मिळणार होता[१०].

लिंडरु च्या मते तेव्हाच या गोष्टीचे मूल्यमापन करता येईल की जेव्हा या स्थानिक संस्था कार्यरत होउन त्यातूनच त्यांना प्रेरणा मिळेल[११]. या संस्थानच्या विकासाबाबत असे सांगता येईल की या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारामध्ये प्रशासकीय हस्तक्षेप किंवा उपदेशात्मक तंत्र असता कामा नये[१२].

विकेंद्रीकरणासाठी रॉयल कमिशन (१९०८) -

१९०८ साली रॉयल कमिशनची नेमणूक करणेत आली. ती प्रामुख्याने लॉर्ड रिपनच्या अपेक्षेप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थाचा विकास न करता खालील तत्वानुसार करणेचा उद्देश होता".

१. प्रत्येक खेडयाला स्थानिक स्वराज्य संस्थेचा मुळ घटक म्हणून मान्यता द्यावी. प्रत्येक खेडयात ग्रामपंचायतीची स्थापना करणेत यावी.

२. स्थानिक सभासद हे बहुमताने निवडले जावेत.

३. म्युनिसिपालीटींनी त्यांचा सभापती सभासदांतून निवडावा.

४. म्युनिसिपालीटींनी त्यांना लागणा-या खर्चाची आर्थिक तरतुद त्यांनी स्वतः करावी.

५. शहरातील मुलांना प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी त्यांनी स्वीकारावी.

तिसरा टप्पा (१९२० ते १९३९) -

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा तिसरा टप्पा प्रामुख्याने १९१९ च्या कायद्यानुसार सुरु होतो. या कायद्यानुसार प्रांताना जबाबदार शासन पध्दती निर्माण करणेत आली. राज्य कारभाराच्या सोईनुसार काही खाती प्रांताकडे व काही खाती केंद्र सत्तेकडे सोपविण्यात आली. प्रांताकडे सोपविलेल्या खात्याबाबत कायदे करण्याचा अधिकार प्रातांच्या विधिमंडळाला देण्यात आला. स्थानिक स्वराज्य संस्थाकडे सार्वजनिक आरोग्य, बांधकाम, शिक्षण, महसूल, पाणी, व्यवस्था, वन, सहकारी संस्था या सारखी खाती प्रांताच्या यादित समाविष्ट करणेत आली. प्रांतिक सरकारला भारत मंत्री जबाबदार राहील अशी तरतूद करणेत आली. या अशा पध्दतीने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात नव चैतन्य निर्माण केले".

चौथा टप्पा - (१९३७ ते १९४७)

१९३६ च्या कायद्याने अनौपचारिकरित्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाच्या टप्याचे उद्‌घाटन झाले असे म्हणण्यास हरकत नाही. १९३५ च्या कायद्याने प्रांतिक सरकारला पूर्ण स्वायतत्ता दिली होती. स्थानिक स्वराज्य संस्थेवर भारत मंत्र्याचे नियंत्रण होते आणि त्यांना आता अधिक अधिकार मिळाले होते. कारण विकास कामासाठी लागणारा पैसा व त्या संबंधीचे अर्थ खाते सुपूर्त करणेत आले होते. परिणामी स्थानिक समितींना आपल्या रचनात्मक कार्याला कसलाच अडथळा राहिला नव्हता. आर्थिक विकासाची रुपरेखा आखण्याचा अधिकार स्थानिक समितींना मिळाला होता. दुस-या महायुध्दानंतर परिस्थिती बदलली. भारत मंत्र्यांनी राजीनामा दिला. परिणामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाला पुन्हा खिळ बसली.

१९४७ ला भारत स्वतंत्र झाला. पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थाना महत्व प्राप्त झाले. सन १९४८ ला सर्व प्रांतातील स्थानिक स्वराज्य संस्थानच्या मंत्र्यांची सभा बोलविण्यात आली. त्यावेळी भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु म्हणाले, ‘स्थानिक स्वराज्य संस्था हया ख-या अर्थाने लोकशाहीचा पाया आहे. वास्तविक पाहता आपल्याला उच्च लोकशाहीविषयी विचार करणेची सवय लागायला हवी तर उच्च लोकशाहीचा पाया भक्कम होईल.’

पाचवा टप्पा (१९५० ते पुढे) -

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा पाचवा टप्पा भारतीय राज्यघटनेने विकसित केला. सन १९५० ला राज्यघटनेने सर्व राज्यांना स्थानिक राज्याचा दर्जा बहाल केला. १९५० पासून स्थानिक सरकारमध्ये बरेच महत्वपूर्ण बदल होत गेले. स्थानिक स्वराज्या संस्थानच्या वेगवेगळया दृष्टीकोनातून अभ्यास करणेसाठी निरनिराळया कमिटीची नेमणूक करणेत आली. या कमिटींनी निरनिराळया सूचना केल्या होत्या. १९४९

13614

ला लोकल फायनान्स इन्कवायरी कमिटी स्थापन झाली.तीने १९५७ ला आपला रिपोर्ट सादर केला. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत होणेसाठी नवीन उत्पन्नाची त्यामध्ये काही हरकती व सूचना मागविल्या जातात. त्यांना पुरेसा वेळ दिला जातो. त्यानंतर नियम ४ प्रमाणे शेवटची नोटीस देवून नगरपालिका स्थापनेसंबंधी आदेश जारी केला जातो.

स्वतंत्र भारतातील लोकशाही सरकारच्या वाढत्या प्रोत्साहनामुळे स्थानिक स्वराज्य संस्था अधिक कार्यक्षम व कर्तव्यक्षम होत आहेत. नागरिकांच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडीत असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाबद्दलची पूर्वग्रह दुषित उदासिनता सोडून त्या सुधारण्यासाठी शक्य ते प्रयत्न करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

**कराड नगरपालिकेची स्थापना -**

पहिला टप्पा - (१५ सप्टेंबर १८५५ ते ३० एप्रिल १८५८)

१८५५ सालापर्यंत मुंबई प्रांतातील बहुतेक मोठया गावात नागरिकांच्या मागणी अर्जावरुन १८५० चा कायदा नं. २६ खाली नगरपालिका स्थापन झालेल्या होत्या. १८५५ सालात कराड शहर प्रथमच इंग्रजी अंमलाखाली असल्याने नागरिकांच्या अर्जाची मार्गप्रतीक्षा न करता सरकारने आपण होऊन लोकमताचा कानोसा घेऊन कराड नगरपालिकेच्या स्थापनेचा जाहिरनामा नं.२८ ता. २९ ऑगष्ट, १८५५ रोजी काढला आणि १५ सप्टेंबर, १८५५ रोजी कराड नगरपालिकेची स्थापना केली.

१५ सप्टेंबर, १८५५ रोजी नेमलेले नगरपालिकेचे सर्वच पंच सरकार नियुक्त होते. सुरवातीची पंच कमेटी सरकारी अधिका-यांची केवळ सल्लागार म्हणून नगरपालिकेचे

काम पहात असे. नागरिकांच्या सहकार्याने शहरात स्वच्छता राखणे यासारख्या किरकोळ कामापुरते प्रथमावस्थेतील नगरपालिकेचे कार्यक्षेत्र मर्यादित होते.

**कराड नगरपालिकेच्या स्थापनेचा जाहिरनामा -**

सातारा जिल्हयापैकी कराड आणि कराड तालुक्यातील इतर गावे यांना सन १८५० चा ॲक्ट नं. २६ लागू करण्याबाबत नागरिकांच्या काय इच्छा आहेत हे आजमावण्यासाठी केलेल्या चौकशीवरुन दिसून येते की शहर सुधारणेच्या कामाकरिता कर देण्याची नागरिकांची तयारी आहे.

म्हणून दि राईट ऑनरेबल गव्हर्नर इन कौन्सिल हे कराड शहरात आणि तालुक्यातील काले, वाठार, कासेगाव, कोळे, ढेबेवाडी, चरेगाव आणि तांबवे या गावात ता. १५ सप्टेंबर, १८५५ पासून १८५० चा ॲक्ट नं.२६ अंमलात येईल असे जाहीर करीत आहेत आणि त्याची अंमलबजावणी करणेसाठी ६ व्या कलमानुसार खालील सद्‌गृहस्थांना कमशिनर्स म्हणून नेमणेत येत आहे.

अध्यक्ष - असि. कलेक्टर - सर बोल्टन

उपाध्यक्ष - तालुका मामलेदार - कृष्णराव वामन

मेंबर्स -

१. राणोजी बिन कृष्णराव डुबल
२. नारो आप्पाजी देशपांडे
३. रामचंद्र रंगनाथ घाटे
४. रामकृष्ण दि॥ बिन धोंड दि॥ गिजरे
५. दादो बळवंत अटकेकर
६. नारो नरसिंह वाघमारे
७. अदमशा वा॥ खुजादमिया
८. आण्णाजी परशराम कराडकर

वरील जाहिरनाम्याने नेमलेले नगरपालिकेचे पहिले आठही मेंबर्स शहरातील प्रतिष्ठित नागरिकांपैकी होते[15].

**पंधरा कलमी यादी -**

नगरपालिकेच्या मार्गदर्शनासाठी सरकारने एक पंधरा कलमाची यादी घालून दिली.

१. म्युनिसिपल कमेटीच्या सभासदांची दरमहा सभा भरावी.

२. सभा भरण्यासाठी एक जागा असावी.

३. लिखाणाचे व हिशेब ठेवण्याच्या कामासाठी एक कारकून, रस्ते दुरुस्तीच्या कामासाठी एक मेस्त्री, दोन शिपाई व रस्ते झाडण्यासाठी चार असामी असानेत.

४. म्युनिसिपाल्टीचा कारकून हिशेबाचे काम प्रामाणिकपणे करील याबद्दलचा जामीन त्याच्याकडून घ्यावा.

५. म्युनिसिपल कमेटीबद्दल जो वसूल येईल तो एका पेटीत घालून ती पेटी मामलेदार कचेरीत ठेवावी.

६. कमेटीचा जमाखर्च मामलेदारकडून तपासून घ्यावा.

७. कमेटीने ठरविलेल्या कोणत्याही खर्चास मामलेदार मार्फत कलेक्टरची मंजुरी घ्यावी.

८. शहराचे भाग करुन एकेक भागावर कमिशनवर नेमावा म्हणजे काय सुधारणा केली पाहिजे व तेथील लोकांचे काय म्हणणे आहे याची चौकशी करुन त्या कमिशनरांनी कमेटीस कळवावे.

९. कोणतेही नवे काम त्याचा नकाशा व एस्टीमेट तयार करुन इंजिनिअरच्या सल्ल्यावाचून किंवा मंजूर झाल्यावाचून आरंभू नये.

१०. खुल्या जागेवर, अगर जुनी पाडून नवीन इमारत बांधणेची असल्यास त्या अगोदर कमेटीकडे अर्ज करुन परवानगी मिळाल्या नंतर बांधकाम करावे.

११. रस्ते झाडणा-या कमेटीच्या नोकरांनी शहरातील निरनिराळे ठिकाणचे रस्ते साफ करुन तेथील कचरा एखाद्या नेमल्या ठिकाणी टाकावा.

१२. सर्व लोकांनी आपापल्या घरापुढील गटार व रस्ता साफ ठेवावी नाही तर दर दिवसात एक आणा दंड येईल.

१३. घराजवळ पडलेली घाण काढण्यास नोटीस किंवा सूचना देऊन त्याने ती काढली नाही तर दर दिवसास दोन आण्यापासून पाच रुपयांपर्यंत दंड म्युनिसिपालिटी घेईल.

१४. नेमून दिलेल्या जागेखेरीज इतरत्र कोणीही घाण केल्यास त्यास मामलेदारकरवी एक ते चार आण्यापर्यंत दंड केला जाईल.

१५. कमेटीचा खर्च भागेल तर उन्हाळयात रस्त्यावर पाणी शिंपावे आणि रात्री दिवे लावावे.

वरील पंधरा कलमी यादीत घालून दिलेल्या धोरणासा अनुसरुन कलेक्टर व मामलेदार यांच्या पूर्ण हुकुमाखाली या नगरपालिकेची कारकीर्द ता. १५ सप्टें १८५५ रोजी सुरु झाली.

**दुसरा टप्पा - (१ मे १८५८ ते ३० एप्रिल १८६७)**

या कालखंडात नगरपालिकेच्या घटनेत विशेष प्रगती झाली नाही. तथापि कामगारांच्या सोईसाठी कमेटीच्या घटनेत यावेळी एक महत्वाचा बदल झाल्याचे दिसून येते. पहिल्या तीन वर्षातील कमेटीचे सर्वच पंच नागरिकांमधून नेमलेले असले तरी त्यांना प्रत्येक बाबतीत कलेक्टरची मंजुरी घेऊन मग काम करावे लागे. या मंजुरीच्या पध्दतीने

कामाची पूर्तता होण्यास अकारण वेळ लागे, ते टाळण्यासाठी सरकारी अधिकारी व नागरिकामधून नेमलेले इतर पंच यांना एकत्र बैठक करुन विचार -विनिमय करता यावा म्हणून ता. १-५-१८५८ पासून खालील प्रमाणे संयुक्त बोर्ड अस्तित्वात आले ही व्यवस्था ता. ३०-४.१८६७ पर्यंत राहिली[१६].

### म्युनिसिपल बोर्ड

| | (सरकारी नोकर) | | (नागरिकामधून नेमलेले पंच) |
|---|---|---|---|
| १. | मॅजिस्ट्रेट (कलेक्टर) | १. | आण्णाजी परशराम कराडकर |
| २. | असि. मॅजिस्ट्रेट | २. | राणोजी बिन कृष्णराव डुबल |
| ३. | मामलेदार | ३. | नारो आप्पाजी देशपांडे |
| ४. | मुनसफ | ४. | सय्यद अदमशा काजी |

### तिसरा टप्पा- (१ मे १८६७ ते ३१ मार्च १८७७)

या कालखंडाच्या सुरवातीस नगरपालिकेच्या घटनेस ब-याच प्रमाणात निश्चित स्वरुप आले. नगरपालिका सन १८६२ सालचा अॅक्ट नं. ९ प्रमाणे नगरपालिकेच्या बोर्डात कलेक्टर मामलेदार इ. सरकारी अधिका-यांचा 'एक्स ऑफिशिओ' कमिशनर्स म्हणून समावेश झाला. शिवाय म्युनिसिपल कारभारात नागरिकांचे सहकार्य वाढावे या दृष्टीने नागरिकांमधून नेमलेल्या कमिशनरांची संख्या एक तृतियांश करण्यात आली. सरकारी आठ आणि नागरिकांमधून नेमलेले पंधरा असे एकूण २३ कमिशनरांचे बोर्ड ता.१-५-१८६७ पासून ता. ३१ मार्च, १८७७ पर्यंत अस्तित्वात होते. कलेक्टर हे या बोर्डाचे अध्यक्ष असत मात्र जनरल कमेटीच्या सभेस से. असि. कलेक्टरच अध्यक्ष म्हणून हजर रहात असत.

जनरल कमेटीचे कमिशनर्स -

(सरकारी नोकर)

१. मे. कलेक्टर - प्रेसिडेंट

२. मे. सेकंड असि. कलेक्टर

३. मे. विद्याधर चिंतामण - मुनसफ

४. मे. सिताराम बळवंत - अ. कारकून

५. मे. सदाशिव रघुनाथ - मामलेदार

६. मे. गणेश रामचंद्र - फौजदार

७. श्री. रामचंद्र दाजी - डॉक्टर

८. श्री. नारायण मनोहर - स्कूल मास्तर

(नागरिकांमधून नेमलेले)

१. श्री नारायण अनंत मुतालीक व अन्य १४ सदस्यांचा यात समावेश होता.

कोणत्याही कारणाने एखादा कमिशनर कमी झाल्यास त्याच्या जागी नवीन कमिशनरची नेमणूक जनरल कमेटीच्या ठरावाने केली जाई. वरील १४ कमशिनरपैकी गोविंद हरी बर्वे हे जनरल कमेटीच्या सभांना गैरहजर असत आणि

१. विद्याधर चिंतामण २. रंगो सखाराम घाटे

३. दादो बळवंत अटकेकर हे मयत झाल्यामुळे ता. २७-४-१८६८ च्या जनरल सभेने नवीन चार कमिशनर नियुक्त केले.

जनरल कमेटीच्या सभासदांची संख्या यावेळी प्रमाणाबाहेर वाढली. शिवाय जनरल कमेटीची सभा तीन महिन्यातून एक वेळ भरत असे. अशा परिस्थितीत म्युनिसिपल कारभाराचा दिवसेंदिवस वाढत चाललेला व्याप सांभाळण्यासाठी निराळी व्यवस्था करणे आवश्यक होते. म्हणून सरकारी पत्र नं. ११७८ सन १८६५ मध्ये जाहीर झालेले मॅनेजिंग

कमेटी संबंधीचे नियम या कालखंडाचे सुरवातीस नगरपालिकेने लागू करुन घेतले आणि या नियमाखाली जनरल बोर्डाने सन १८६८/६९ साली नगरपालिकेच्या पहिल्या मॅनेजिंग कमेटीची निवड झाली.

**पहिली मॅनेजिंग कमेटी -**

१. श्री रामचंद्र विष्णू भागवत - चेअरमन

२. श्री गोविंद हरी नेवासकर

३. श्री रामचंद्र जोती देशपांडे

४. श्री बापुशा चांदशा काझी

५. श्री वासुदेव रामचंद्र काळे

६. श्री रामचंद्र दाजी

७. श्री गणेश रामचंद्र

मॅनेजिंग कमेटीच्या सभासदांची संख्या सात असे. तिचा चेअरमन व बहुतेक सभासद नागरिकांमधून नेमलेल्या कमिशनरपैकी असत. या कमेटीच्या सभा आठवडयातून एक वेभ भरावी असा निर्बंध होता. तसेच दरसाल जनरल कमेटीकडून मॅनेजिंग कमेटीची निवड करण्यात येई. म्युनिसिपल कारभारातील अंमलबजावणीचे व देखरेखीचे काम प्रामुख्याने या कमेटीकडे आले. नगरपालिकेच्या घटनेतील प्रगतीचा हा महत्वाचा टप्पा होय.

पहिले सेक्रेटरी - नगरपालिकेचे कारकून तुकाराम भिकाजी कुलकर्णी यांना २५-३-१८७६ पासून सेक्रेटरी म्हणून नेमण्यात आले[९].

**चौथा टप्पा (१ एप्रिल १८७७ ते ३० जून १८८५) -**

या कालखंडाच्या सुरवातीस सन १८७३ चा ॲक्ट नं. ६ हा नगरपालिकेचा नवा कायदा या कालखंडाच्या सुरवातीस अंमलात आला. या नवीन कायद्याने नगरपालिकांना

कार्पोरेट बॉडी म्हणून कायदेशीर अस्तित्व प्राप्त करुन दिले आणि नगरपालिकांची कर्तव्ये व अधिकार अधिक निश्चित केले.

सदर कायद्याखाली दहा हजाराचेवर लोकसंख्या असलेल्या शहरातील नगरपालिकांना 'सिटी म्युनिसिपालिटी' चे व त्याहून कमी लोकसंख्या असलेल्या शहरातील नगरपालिकांना 'टाऊन म्युनिसिपालिटी' चे अधिकार दिले जात असत. यावेळी कराड शहराची लोकसंख्या १०,००० चे वर असल्याने या नगरपालिकेस सिटी म्युनिसिपालिटीचे अधिकार मिळावेत अशी मागणी करुनही ते अधिकार या नगरपालिकेस मिळू शकले नाहीत. या कारणाने या कालखंडात सदर अॅक्टमधील टाऊन म्युनिसिपालिटीच्या घटनेप्रमाणे नगरपालिकेची घटना राहिली.

जनरल बोर्डाचे कमिशनर-

(सरकारी नोकर)

१. मे. कलेक्टर - प्रेसिंडेट

२. मे. सेकंड असि. कलेक्टर व्हा. प्रे.

३. मे. रावसो - मामलेदार

४. मे. चीफ कॉन्स्टेबल

५. श्री रामचंद्र दाजी - डॉक्टर

(नागरिकांमधून नेमलेले)

श्री रामचंद्र विष्णू भागवत - चेअरमन व इतर ९ कमिशनराचा समावेश होता.

**मॅनेजिंग कमेटी -**

दरवर्षी मॅनेजिंग कमेटी निवडली जाई आणि तिचे चेअरमन रामचंद्र विष्णू भागवत यांचीच निवड होत असे. ता. १८-१.१८८३ रोजी त्यांनी चेअरमन जागेचा राजीनामा

दिला. तथापि बरीच वर्षे त्यांनी चेअरमन म्हणून अनेक जोखमीची कामे केलेली होती. या मुद्यावर जनरल कमेटीने त्यांचा राजीनाम नामंजूर केला.

श्री गोविंद गोपाळ ओक यांनी १८७६ ते १९०१ पर्यंत सेक्रेटरी म्हणून काम पाहिले[१८].

**पाचवा टप्पा - (१ जुलै १८८५ ते ३१ मार्च १८८९)**

१८८४ चा म्युनसिपालिटी अॅक्ट नं. २ नगरपालिकांचा नवीन कायदा यावेळी अंमलात आला. या कायद्यान्वये नगरपालिकांच्या बाबतीत बरेच क्रांतीकारक बदल घडवून आणले.

१. नगरपालिकेच्या सभासदांपैकी निम्मे सभासद निवडून देण्याचा अधिकार नागरिकांना प्रथमच मिळाला.

२. एक्स ऑफिशिओ सभासदांचा प्रकार रद्द केला.

३. नॉमिनेटेड सभासदांमध्ये निम्म्याहून अधिक सरकारी नोकर नसावेत असा निर्बंध घातला.

४. 'टाऊन व सिटी' म्युनिसिपालटी हा भेद नाहीसा केला.

५. नगरपालिकेच्या सभासदांमधूनच सरकारने अध्यक्ष नेमावा आणि नेमलेला अध्यक्ष सरकारी नोकर असेल तर नगरपालिकेने आपला उपाध्यक्ष निवडावा अशी सवलत देण्यात आली.

नव्या कायद्यातील वरील तत्वास अनुसरून सरकारने पत्र नं. १३४२ ता. १४-२-१८५५ ने कराड नगरपालिकेची घटना खालील प्रमाणे केली -

१. निवडणुकीसाठी शहराची विभागणी सहा वॉर्डस मध्ये करण्यात आली.

२. प्रत्येक वार्डमधून एक याप्रमाणे निवडून आलेले-६

मे. कमिशनर यांनी नेमलेले - सरकारी नोकर - ३

मे. कमिशनर यांनी नेमलेले नागरिक -३ अशी सर्व मिळून सभासद संख्या १२ ठरविण्यात आली.

३. म्युनिसिपल हद्दीतील पदवीधर, वकील, ऑनररी मॅजिस्ट्रेटस आणि नगरपालिकेस वार्षिक दीड रुपया कर भरणारे - अशा लोकांना मतदानाचा हक्क देण्यात आला.

**पहिली निवडणूक -**

या कालखंडातच कराड नगरपालिकेची पहिली निवडणूक घेण्यात आली. प्रत्येक वार्डातून एक याप्रमाणे निवडून द्यावयाच्या सहा प्रतिनिधींची निवडणूक गुप्तमतदान पध्दतीने ता. १० जुलै, १८८५ रोजी पार पडली. नगरपालिकेच्या इतिहासातील ही पहिलीच निवडणूक होती. १०-७-१८८५ रोजी निवडणूक होऊन ११-७-१९८५ साली मतपेटया जनरल कमेटीच्या समोर फोडण्यात आल्या. त्यामध्ये उभे राहिलेले उमेदवार व त्यांना पडलेली मते पुढील प्रमाणे -

| अ नं. | वार्ड | एकूण मतदार | एकूण मतदान | मतदानाचे शे. प्रमाण | उमेदवाराचे नाव | मिळालेली मते |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | सोमवार | ९८ | ४४ | ४३% | १. भास्कर गोपाळ सावरकर | २ |
| | | | | | २ .गणेश चिंतामण भाटे | २ |
| | | | | | ३. विठ्ठल महिपत सुपनेकर | १ |
| | | | | | ४. रा. ब. नारायण, अनंत मुतालीक | ३ |
| | | | | | ५.विनायक नारायण देशपांडे | ११ |
| | | | | | ६. रामचंद्र विष्णू भागवत | २५ |
| २. | मंगळवार | ११ | ८ | ७५% | १. रामकृष्ण श्रीधर पाठक | ४ |
| | बुधवार | | | | २. परमचंद आबावंद गुजर | ४ |
| ३. | गुरुवार | ६७ | ५२ | ७५ | १. राजाराम रामचंद्र काळे | ३ |
| | | | | | २. परमचंद आबाचंद गुजर | १ |
| | | | | | ३. रामचंद्र विष्णू भागवत | ४८ |
| ४. | शुक्रवार | २२ | १४ | ६२ | १. चांदशा मनेशा काजी | १४ |
| ५. | शनिवार | १३ | १४ | ९२ | १. विठ्ठल महिपत सुपनेकर | १२ |
| ६. | रविवार | ३५ | २२ | ६२ | १. बाळकृष्ण रामचंद्र काळे | १ |
| | | | | | २. रामचंद्र विष्णु भागवत | १ |
| | | | | | ३. नारो विठ्ठल घाटे | २० |

**पहिले नगराध्यक्ष -**

पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीइतकीच यावेळी दुसरी एक महत्वपूर्ण घटना म्हणजे सरकारने नागरिकांपैकी रावबहादूर नारायण अनंत मुतालीक यांची नगरपालिकेचे प्रेसिडेंट म्हणून नेमणूक केली. रा. ब. मुतालीक हे नागरिकांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष

नगरपालिकेचे पहिले अध्यक्ष.



**कै. रावबहादूर नारायण अनंत मुतालीक.**

नागरिकांमधून निवडलेले पहिले नगराध्यक्ष ( ता. १-१०-१८८५ ते ३०-९-१८८६ )
सतत बावीस वर्षे ( १८६७ ते १८८९ ) नगरपालिकेचे नॉमिनेटेड सभासद
पंतप्रतिनिधींचे मुखत्यार.

होय." रा. ब. नारायण अनंत मुतालीक यांच्या अध्यक्षपदाची मुदत १ ऑक्टोंबर १८८५ पासून एक वर्षाची राहिली.

१ ऑक्टोंबर, १८८६ रोजी नगरपालिकेचे लोकनियुक्त सभासद श्री रामचंद्र विष्णु भागवत यांची सरकारने नगरपालिकेचे प्रेसिडेंट म्हणून नेमणूक केली आणि या बोर्डाच्या अखेर मुदतीपर्यंत लोकप्रतिनिधी श्री भागवत हेच नगराध्यक्ष राहिले.

नारो विठ्ठल घाटे यांना मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन म्हणून निवडले गेले.

**सहावा टप्पा - (१ एप्रिल १८८९ ते ३१ मार्च १९१०)**

नगरपालिकेच्या इतिहासातील एकवीस वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडात फारशी प्रगती झाली नाही. विशेष भरीव कामगिरी होऊ शकली नाही.

त्रैवार्षिक निवडणुकांच्या सोईसाठी वार्डांची संख्या सहा कायम राहिली आणि या सहा वार्डातून प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण सहा लोकनियुक्त सभासद दर तीन वर्षांनी निवडले जात. १८८९ च्या सुरवातीस झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकानंतर त्या सालच्या एप्रिलपासून अस्तित्वात आलेल्या या काळातील पहिल्या बोर्डात सहा लोकनियुक्त व सहा नॉमिनेटेड असे एकूण बारा सभासद होते.

सहा लोकनियुक्त सभासदापैकी मे. भास्कर गोपाळ सावरकर यांची ता. १-४-१८८९ पासून ३ वर्षाच्या मुदती करिता नगरपालिकेचे प्रेसिडेंट म्हणून सरकारी ठरावाने नेमणूक झाली. त्यांनी २५ मे १८८९ रोजी राजीनाम दिला.

सरकारी ठराव नं. २४४८ ता. ९ जुलै १८९१ ते ता. १-७-१८९१ पासून नगरपालिकेतील नॉमिनेटेड सभासदांची संख्या सहाची सात करण्यात आली आणि नगरपालिकेचे अध्यक्ष म्णहून असि. कलेक्टर मे. जी. डी. पानसे यांची नेमणूक झाली



कै. रामचंद्र विष्णु उर्फ भाऊसाहेब भागवत,
लोकनियुक्त सभासदांमधून नेमलेले पहिले नगराध्यक्ष ( ता. १-१०-१८८६ ते ३१-३-१८८९ ),
मॅनेजिंग कमेटीचे पहिले नि दीर्घ काळ चेअरमन ( १८६८ ते १८८६ ),
हुषार वकील, [illegible] व वजनदार सामाजिक नि राजकीय पुढारी.

| |
|---|
| कराड [illegible] आद्य संस्थापकांपैकी तीन जण |



कै. चांदशा मनेशा काझी,
१८७४ पासून १९०७ पर्यंत सुमारे सत्तावीस वर्षे नगरपालिकेत नॉमिनेटेड व लोकनियुक्त सभासद; म्युनिसिपल कमेटी व मॅनेजिंग कमेटीचे काही वर्षे चेअरमन, वतनदार, मुख्य काझी; १८८८ साली स्थापन झालेल्या तालुका काँग्रेसचे अध्यक्ष.



कै. नारो विठ्ठल भाटे,
मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन (ता. १-१०-१८८६ ते ३१-३-१८८९) [illegible] लोकनियुक्त सभासद; प्रसिद्ध सावकार नि जमीनदार, [illegible] सभेचे [illegible].

यावेळ पासून १९०९ सालापर्यंत बहुसंख्य नॉमिनेटेड सभासद आणि सरकारी अधिकारी अध्यक्ष अशी कराड नगरपालिकेची प्रतिगामी राहिली.

१८८५ सालात राष्ट्रीय सभेचा जन्म झाला व तीचा प्रसार झाला. १८८९-९० सालापासून राष्ट्रीय सभेवर सरकारची गैरमर्जी झाली. तथापि सरकारच्या गैरमर्जीस न जुमानता राष्ट्रीय वृत्तीच्या लोकांनी शहराशहरातून राष्ट्रीय सभेचा प्रचार चालू ठेवला. याच सुमारास नगरपालिकेचे माजी अध्यक्ष श्री रामचंद्र विष्णु भागवत व श्री नारो विठ्ठल घोट, श्री चांदशा मनेशा काजी यांच्या अध्यक्षताखाली 'राष्ट्रीय सभा' या विषयावर सभा घेतली श्री घाटे व काजी हे नगरपालिकेचे लोक-नियुक्त सभासद होते. याचा थोडाफार परिणाम नगरपालिकेच्या प्रगतीवर झालेला असावा.

सन १८९२ ते १९०९ पर्यंत असि. कलेक्टरचीच प्रेसिडेंट म्हणून नेमणूक झाली आणि मे. नारायण यांची व्हाईस प्रेसिडेंट पदी नेमणूक झाली.

मात्र १-४-१९०९ पासून नगरपालिकेच्या अध्यक्षपदाच्या बाबतीत एक महत्वाचा प्रगतीपर बदल घडून आला. यावेळी प्रथमच सरकारी ठराव नं. १३१३ ता. १० मार्च १९०९ ने नगरपालिकेस स्वतःचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार मिळाला. मात्र ती निवड सभासदांच्या एकूण संख्येपैकी दोन तृतीयांश मतांनी झाली पाहिजे आणि न झाल्यास सरकारकडून अध्यक्ष नेमला जाईल अशी अट घालण्यात आली.

नव्याने मिळालेल्या अधिकाराप्रमाणे अध्यक्षाची निवडणूक करण्यासाठी ता. १५-४-१९०९ रोजी जनरल बोर्डाची सभा बोवलिवली या सभेत अध्यक्षपदासाठी श्री नारायण रामचंद्र भागवत व मे. मामलेदार अशी दोन नावे पुढे आली. या दोन सुचनांवर मते घेता श्री भागवत यांना निम्म्याहून अधिक परंतु दोन तृतीयांशापेक्षा कमी

मत पडली. अशाप्रकारे नवीन मिळालेल्या या अधिकाराचा आपापसातील मतभेदामुळे अंमल होऊ शकला नाही. अखेरीस सरकारकडूनच अध्यक्षाची नेमणूक व्हावी असा जनरल कमिटी ठरावाने रिपोर्ट करण्याला. त्याप्रमाणे श्री भागवत यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली व व्हाईस प्रेसिडेंटच्या जागी कृष्णाजी सिताराम देशपांडे यांची निवड झाली.

**सब कमेटया -**

नगरपालिकेने सन १८६८-६९ सालापासून मॅनेजिंग कमेटी निवडण्यास सुरवात केली म्हणून कारभारातील सर्व प्रकारचे अंगलबजावणीचे काम मॅनेजिंग कमेटीकडे असे १८८९ सालापर्यंत म्युनिसिपल कारभाराचा व्याप बराच वाढला होता. १८६५ सालात नगरपालिकेने दवाखाना सुरु केला. प्राथमिक शाळा ताब्यात घेतल्या आणि १८९०-९१ सालापासून खाजगी संडास सफाईची जबाबदारीही नगरपालिकेकडे आली. या प्रकारे वाढत गेलेल्या कामाचा व्याप मॅनेजिंग कमेटीच्या आवाक्याबाहेर गेला. अंमलबजावणीच्या व देखरेखीच्या कामाची विभागणी करणे आवश्यक झाले. म्हणून नगरपालिकेने १८८९ सालापासून दवाखान्याची व्यवस्था पाहण्याकरिता 'डिस्पेन्सरी कमेटी' व प्राथमिक शाळांची व्यवस्था पाहणेकरिता 'स्कूल कमेटी' अशा दोन स्वतंत्र सब कमेटया निवडण्यास सुरवात केली. तसेच १८९५ साली 'सॅनिटरी कमेटी' अस्तित्वात आली[२०].

सेक्रेटरी -
१. श्री गोविंद गोपाळ ओक (१९०१ पर्यंत)
२. एम. व्ही. परांजपे (१९०४ पर्यंत)
३. आर. व्ही. हसबनीस (१९०४ पासून)

## सातवा टप्पा - (१ एप्रिल १९१० ते ३१ मार्च १९२०)

या दहा वर्षाच्या कालावधीत नगरपालिकेच्या घटनेत विशेष बदल झाला नाही. जनरल बोर्डाच्या एकूण तेरा सभासदांपैकी सहा लोकनियुक्त आणि सात नॉमिनेटेड हीच अवस्था यावेळी चालू राहिली. दाने तृतियांश मताने स्वतःचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार नगरपालिकेस यापूर्वीच मिळालेला होता. पण त्याचा प्रत्यक्ष अंमल मात्र यावेळ पर्यंत झाला नाही. कारण अध्यक्ष निवडण्याचा नगरपालिकेने १९०९ साली केलेला पहिला प्रयत्न मतभेदामुळे निष्फळ ठरला. यावेळी मात्र नगरपालिकेची घटना पूर्वीचीच राहिली तरी परिस्थिती बरीच निवळलेली दिसते. १९१० ते १९२० या मुदतीत एकूण तीन त्रैवार्षिक निवडणुका झाल्या.

१९१० ते १९१६ या कालखंडात दोन बोर्डातील सभासदांच्या सहकार्याने अधिकाराच्या मुख्य जागा अखेरपर्यंत लोकनियुक्त सभासदांकडे राहिल्या. ता. २६-४-१९१० रोजी श्री लक्ष्मण महादेव देशपांडे हे नगरपालिकेचे पहिले लोकनियुक्त अध्यक्ष म्हणून निवडले गेले व तेच १९१० ते १९१६ अखेर नगराध्यक्ष राहिले. याशिवाय त्यांनी डिस्पेन्सरी कमेटी व स्कूल कमेटी चेअरमन, नगरपालिका, आधुनिक पाणी पुरवठा योजनेचे प्रणेते, १९२६-३० मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद,१९३० च्या 'गोलमेज परिषद' चे वर्णाश्रम स्वराज्य संघाचे प्रतिनिधी कराड बॅकिंगचे प्रवर्तक इ. पदे भूषविली.

त्याचप्रमाणे या कालखंडात उपाध्यक्ष व मॅनेजिंग कमेटीचे चेअरमन या जागेवर श्री कृष्णाजी सिताराम देशपांडे व श्री विश्वनाथ ज्ञानोबा बटाणे हे लोकनियुक्त सभासद होते[२१].

याच कालखंडात नगरपालिकेच्या पाणी पुरवठयाची महत्वाची योजना आखली जाऊन पूर्ण झाली. या कालखंडात नगरपालिकेची आर्थिक स्थिती बिकट

असतानादेखील केलेली कामे प्रशंसनीय आहेत. त्याचे श्रेय नगराध्यक्ष श्री लक्ष्मण महादेव देशपांडे व त्यांच्या सहकारी यांच्या चिकाटीने केलेल्या प्रयत्नांना आहे[२२].

सन १९१६ ते १९२० काळात तिसरे बोर्ड अस्तित्वात आले व पहिल्या दोन बोर्डाच्या मुदतीत सभासदांमध्ये असलेला एकोपा या तिस-या बोर्डाच्या वेळी मात्र लोप पावलेला दिसतो. मतभेदामुळे हे बोर्ड स्वतःचा अध्यक्ष निवडण्यास असमर्थ ठरले. म्हणून सरकार तर्फे रावसो टी. सी. घैसास, मामलेदार यांची अध्यक्ष म्हणून नेमणूक झाली. एवढेच नव्हे तर सभासदातील वाढत्या मतभेदामुळे अध्यक्ष निवडण्याचा नगरपालिकेचा अधिकार सरकारने ठराव नं. ९४० ता. ५-२-१९१८ रोजी काढून घेतला. रावसो घैसास यांनी १९१८ साली अध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याने अध्यक्ष म्हणून श्री नारायण रामचंद्र भागवत यांची सरकारने १५ एप्रिल १९१८ रोजी नेमणूक केली.

तीन वर्षाकरिता अस्तित्वात आलेल्या या तिस-या बोर्डाची मुदत सरकारने आणखी एक वर्ष वाढविली[२३].

## आठवा टप्पा - (१ एप्रिल १९२० ते ३१ मार्च १९२६)

या कालखंडात नगरपालिकेच्या घटनेत लोकशाहीच्या दृष्टीने महत्वाचे व प्रगतीपर बदल झाले. या मुदतीत दोन त्रैवार्षिक निवडणुका झाल्या. १९२० च्या पहिल्या त्रैवार्षिक निवडणुकीच्या वेळी शहराचे सहा ऐवजी चार वॉर्ड पाडले आणि प्रत्येक वॉर्डास दोन सभासद निवडून देण्याचा अधिकार देण्यात आला. हा बदल करण्यामागे अल्पसंख्य समाजांना प्रतिनिधित्व मिळावे असा हेतू होता. तो हेतू अधिक परिणामकारक रीतीने साध्य व्हावा म्हणून या काळातील १९२३ सालच्या दुस-या त्रैवार्षिक निवडणुकीच्या वेळी प्रत्येक वॉर्डास तीन सभासद निवडून देण्याचा अधिकार

मिळाला. वॉर्डातून निवडून जावयाच्या प्रतिनिधीच्या संख्येइतकी मते आपल्या इच्छेप्रमाणे देण्याचा मतदाराला हक्क असे वार्षिक चार आणे प्रत्यक्ष म्युनिसिपल कर देणा-यास मतदानाचा हक्क १९२३ साली मिळाला. तोपर्यंत प्रत्यक्ष म्युनिसिपल कर देणा-यांच्या बाबती किमान वार्षिक दंड रुपाया कराची मर्यादा होती.

१९२० सालापासून नॉमिनेटेड सभासदांची संख्या कमी होत गेली त्या सालापर्यंत लोकनियुक्त सहा सभासद तर नॉमिनेटेड सात सभासद अशी अवस्था होती. १९२० साली नॉमिनेटेड सभासदांची संख्या एकूण सभासद संख्येच्या एक तृतियांश करण्यात आली आणि १९२३ सालापासून एक पंचमांश झाली.

दोन तृतियांश मतांनी आपला अध्यक्ष निवडण्याचा नगरपालिकेचा हक्क सरकारने १९१८ साली काढून घेतला होता. तो या कालखंडात हुकुम नं. ३१०७ ता. २३-३-१९२० ला परत देण्यात आला.

१९२० ते १९२३ या काळात पहिल्या बोर्डाच्या अध्यक्षीय निवडणुकीच्या बाबतीत कलेक्टरमार्फत दडपण आणले गेले. तथापि त्या दडपणाच्या जोरावर नॉमिनेटेड सभासदांनी आणलेली उपसूचना फेटाळली गेली आणि सर्व लोकनियुक्त सभासदांच्या दोन तृतियांश मतानी श्री सितारात गोपाळजी पाटील यांची अध्यक्षपदी निवड झाली.

१९२३ ते १९२६ बोर्ड नं. २ च्या काळात श्री कृष्णाजी मारुतराव कळंबे हे नॉमिनेटेड सभासद असले तरी ते पहिल्या क्रांतिकारक संघटनेतील धडाडीचे व लोकप्रिय कार्यकर्ते असल्याने या बोर्डाचे अध्यक्ष म्हणून त्याची निवड एकमताने झाली.

**वॉटर वर्क्स कमेटी -**

१९१८ साली सुरु झालेल्या नवीन पाणी पुरवठयाची व्यवस्था पाहणेकरिता १९२०-२१ पासून स्वतंत्र सब कमेटी निवडली.

**एक्झिक्युटीव्ह ऑफिसर -**

१९२०-२१ साल अखेरपर्यंत सेक्रेटरी हा नगरपालिकेतील प्रमुख अधिकारी असे. १९२१ सालापासून प्रमुख अधिकारी म्हणून एक्झिक्युटीव्ह ऑफिसरच्या नेमणूकीस सुरुवात झाली. नगरपालिकेचे सुरवातीचे एक्झिक्युटीव्ह ऑफिसर पुढील होते[२४]

१. श्री व्ही. आर. शितूत (५-९-१९२१)

२. श्री एम. आर. भिडे (७-९-१९२१)

**नववा टप्पा - (१ एप्रिल १९२६ ते ३१ ऑक्टो. १९३८)**

या कालखंडात उल्लेख करण्यासारखा घटनात्मक बदल म्हणजे अल्पसंख्य असलेल्या मुसलमान समाजास निश्चित प्रतिनिधित्व मिळावे म्हणून १९२६ सालच्या त्रैवार्षिक निवडणुकीपासून प्रथमच मुसलमान मतदारसंघ वेगळा करण्यात आला. त्यामुळे पूर्वी अस्तित्वात असलेले चार वॉर्डस व एक स्वतंत्र मुस्लिम वॉर्ड मिळून वॉर्डांची संख्या पाच झाली आणि वॉर्ड वार सोमवार २, मंगळवार ३, गुरुवार ३, शुक्रवार २ व मुस्लिम वॉर्ड २ असे लोकनियुक्त बारा अधिक मामलेदारांसह नॉमिनेटेड तीन मिळून नगरपालिकेची एकूण सभासद संख्या पंधरा झाली.

या कालखंडात सुरुवातीस खानसो कच्छी यांची निवड झाली. परंतु १७-१२-१९२७ ला त्यांनी राजीनामा दिला. त्यानंतर २३-१२-१९२७ मे मारुतराव गोपाळराव शिंदे यांची अध्यक्ष म्हणून निवड झाली. पुढे शिंदेंनी राजीनामा दिल्यावर

२२-२-१९२८ खानसो कच्छी यांचीच अध्यक्षपदी निवड झाली. त्यामुळे जवळ जवळ २१ वर्षे ते नगराध्यक्ष होते व याच काळात मे. किसनलाल प्रेमराज मारवाडी हे या मुदतीत सतत उपाध्यक्ष राहिले. त्यामुळे नगरपालिकेच्या कारभारात एकसुत्रीपणा राहिला आणि म्युनिसिपल दवाखाना इमारत, मंडई, मार्केट इमारत इ. उल्लेखनीय कामे यावेळी झाली[२५].

<u>एक्झिक्युटीव्ह ऑफिसर</u> -

१. श्री एम. आर. भिडे - १९३० पर्यंत

२. श्री सखाराम हरी तावरे - १९३२ पर्यंत

३. श्री दत्तात्रय वासुदेव कुमठेकर - १९३६

४. श्री अनंत सखाराम विव्दांस - १९३६ पासून

**दहावा टप्पा - (१ नोव्हें. १९३८ ते १९४६)**

या कालखंडाच्या सुरवातीस नगरपालिकेच्या घटनेत बरेच महत्वाचे प्रगतीपर बदल झाले. नॉमिनेशनची (सरकार नियुक्त सभासद) पध्दती पूर्णपणे नष्ट करण्यात आली. निवडणुकीच्या कारणासाठी वॉर्डाची फेररचना करुन पाच जनरल व मुसलमान मतदारसंघ एक असे एकूण सहा वॉर्डस बनविण्यात आले. प्रत्येक वॉर्डातील लोकसंख्येच्या प्रमाणात सोमवार ३, मंगळवार ३, गुरुवार ३, शुक्रवार ३, शनिवार २ व मुस्लिम वॉर्ड ३ असे एकूण सभासद संख्या १७ करण्यात आली.

यावेळी प्रथमच मंगळवार वॉर्डातील तीन जागांपैकी एक जागा हरिजनांकरता राखीव ठेवण्यात आली. १९२४ पर्यंत स्त्रियांना नगरपालिकेचे सभासद होण्याची बंदी होती ती या साली उठविण्यात आली. पण १९३८ सालापर्यंत एकही स्त्री सभासद होऊ शकली नाही. म्हणून १९३८ पासून सोमवार, गुरुवार, शुक्रवार या वॉर्डात क्रमाने फिरती जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात आली.

शिवाय यावेळी मतदानाचा अधिकारही अधिक विस्तृत करण्यात आला. मतदारांच्या यादीत समाविष्ट होण्यास आजपर्यंत पात्र असलेल्या मतदाराशिवाय मालक अगर कूळ या नात्याने ज्याच्या कब्जात म्युनिसिपल हद्दीतील अगर हद्दीबाहेरच्या दोन मैलातील वार्षिक किमान बारा रु. भाडे येईल अशी इमारत असेल अशा लोकांनाही यावेळी मतदानाचा हक्क देण्यात आल्याने मतदारांची संख्या ३७८५ पर्यंत वाढली.

वरील दुरुस्त घटनेप्रमाणे संपूर्ण लोक नियुक्त सभासद असलेले पहिले बोर्ड ता. १-११-१९३८ साली अधिकारावर आले व राऊ बाळा कदम हे नगराध्यक्ष झाले.

हे बोर्ड अधिकारावर असताना कलेक्टरकडील पत्र नं. १९२७ ता.१-१०-१९४० ने सरकारतर्फे नगरपालिकेच्या कारभारावर खालील प्रमाणे आक्षेप घेण्यात आले.

नगरपालिकेची सांपत्तिक परिस्थिती असमाधानकारक आहे ती सुधारण्यासाठी अनेकदा सूचना करुन ही प्रकाशपट्टी इ. कर बसविले नाहीत. जकातीचा रिवाजपट कित्येक वर्ष रिव्हाईज केला नाही. अनेक सालाची प्रकरणे निकालाशिवाय तशीच पडून आहेत. अनावश्यक नोकरांची भरती वगैरे बाबींसाठी खर्चाचा बोजा वाढविला आहे. इलेक्ट्रीक कंपनीशी एकांगी करार केला आहे. रस्ते दुरुस्ती व शहर सफाई प्राथमिक कर्तव्याकडे दुर्लक्ष केले. नगरपालिकेच्या कारभारावर अनिष्ट परिणाम करण्याइतकी सभासदामध्ये सत्ता स्पर्धा आहे.

सदर आक्षेपाचे निराकरण करणेसाठी प्रयत्न केले. नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी म्युनिसिपल दवाखान्यात येणा-या रोग्यं ावर १९४० पासून अल्पप्रमाणात फी बसविली. करमणूक कर, हॉटेल्स वगैरेवर लायसेन्स फी बसविली. सार्वजनिक भंगी पट्टी व प्रकाशपट्टी हे कर बसविण्याचे अश्वासन दिले. पडून राहिलेली प्रकरणे निकालात काढली बाकी वसुलीसाठी रिकव्हरी ऑफिसरची परत

मागणी केली. अनावश्यक तेरा म्युनिसिपल नोकर कमी केले. यावेळी या बोर्डाने नगरपालिकेचा कारभार सुधारण्यासाठी केलेले प्रयत्न विचारात घेता आवश्यक त्या सुधारणा सरकारला लोकनियुक्त प्रतिनिधींच्या मार्फत करुन घेता आल्या असत्या. तथापि, नगरपालिकेने तातडीने केलेल्या सुधारणांचा व दिलेल्या आश्वासनाचा उपयोग न होऊन अखेरीस सरकारी ठराव नं. ४२९५/३३ ता. १९ डिसेंबर, १९४० ने नगरपालिका सुपरसीड (सरकार जमा) करण्यात आली. नगरपालिकेचा कारभार सरकाने आपल्या हातात घेतला व तो पाहण्यासाठी ॲडमिनिस्ट्रेटरची नेमणूक केली.

**ॲडमिनिस्ट्रेटर -**

रोवसो भीमराव बळवंतराव माळवे -

नगरपालिकेच्या कारभाराचा ताबा ॲडमिनिस्ट्रेटर यांनी १९४० रोजी घेतला. सरकारी नोकर या नात्याने ॲडमिनिस्ट्रेटरला लोकप्रतिनिधी प्रमाणे लोकमताची फारशी धास्ती नसल्यामुळे सरकारने सुचविलेले नवीन कर बसविता आले. कराची बाकीही ब-याच प्रमाणात वसूल झाली. यावेळपासून नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती झपाटयाने सुधारत गेली. दोन वर्षाच्या मुदतीत अनुभविक ॲडमिनिस्ट्रेटर श्री भीमराव बळवंतराव माळवे यांनी प्रत्येक बाबतीत बारकाईने लक्ष घालून नगरपालिका कारभार सुधारला व रस्ते, गटारे इ. बरीच शहर सुधारणेची कामे केली.

ॲडमिनिस्ट्रेटरची एकतंत्री कारकीर्द १८-१-१९४३ रोजी संपली आणि नवीन निवडणुका होऊन दुसरे लोकनियुक्त बोर्ड १९४३ रोजी अधिकारावर आले व मे. सदाशिव कृष्ण बहुलेकर नगराध्यक्ष झाले.

शहराची लोकसंख्या सतरा हजारावर व वार्षिक उत्पन्न दीड लाखावर गेल्याने कराड नगरपालिकेस 'बरो म्युनिसिपालिटीचे' अधिकार मिळावेत यासाठी वरील

बोर्डाने ठ. नं. ८/५० ता. ३१-७-१९४४ चा ठराव करून प्रयत्न सुरु केले. नगराध्यक्ष श्री सदाशिव कृष्ण बहुलेकर यांनी याबाबतीत प्रामुख्याने लक्ष घातले. अखेरीस सरकारी ठराव नं. ७७९७ ए-ता. २८-३-१९४६ होऊन पुढील बोर्डाच्या सुरवातीपासून या नगरपालिकेस 'बरो म्युनिसिपालटीचे' स्थान प्राप्त झाले. नगराध्यक्ष श्री एस. के. बहुलेकर यांनी राजीनामा दिल्याने श्री राऊ बाळा कदम यांची २१-२-१९४६ पासून अध्यक्षपदी दुस-यांदा निवड झाली.

एक्झिक्युटिव्ह ऑफिसर - श्री अनंत सखाराम विन्दांस

**सब कमेटया -**

नगरपालिकेच्या कामाचा व्याप वाढत गेल्याने सर्वच कामाच्या अंमलबजावणीची जबाबदारी झेपणे सदर कमेटीच्या आवाक्याबाहेर गेले आणि म्हणून नगरपालिकेने जरुरीप्रमाणे विशिष्ट प्रकारच्या कामाकरिता निराळया सब कमेटया निवडण्यास सुरवात केली. स्टॅंडिंग कमेटी व तीला जवळ असणा-या सब कमेटीच्या सभासदांपैकी एकाची त्या सब कमेटीचा चेअरमन पदी निवड होते. नगरपालिकेचे अंमलबजावणीचे काम सांभाळण्यासाठी पुढीलप्रमाणे सब-कमेटया अस्तित्वात आहेत[२६].

१. स्टॅंडिंग कमेटी - एकूण ११ सभासद

२. वर्क्स कमेटी - एकूण ७ सभासद

३. सॅनिटरी कमेटी - एकूण ७ सभासद

४. वॉटर वर्क्स कमेटी - एकूण ७ सभासद

५. कॉपेन्सेशन कमेटी - एकूण ७ सभासद

**अकरावा टप्पा (१ ऑगस्ट १९४६ ते १९५५) -**

सरकारी ठराव नं. ७७९७ ता.२८.३.१९४६ वरुन नगरपालिकेस 'बरो म्युनिसिपालिटीचे' स्थान प्राप्त झाल्यामुळे बॉम्बे म्युनिसिपल बरोज अॅक्ट, १९२५ मध्ये सांगितलेली नगरपालिकांची व्यापक कर्तव्ये नि जबाबदा-या ओघाने या नगरपालिकेवर पडल्या. त्यादृष्टीने निवडणुकांच्या कारणांसाठी वॉर्डाची फेररचना होऊन वॉर्डवार लोकसंख्येच्या प्रमाणात नगरपालिकेची सभासद संख्या बावीसपर्यंत वाढविण्यात आली. एकूण वॉर्ड संख्या सहा होती.

वॉर्ड नं.४ पैकी एक जागा हरिजनासाठी आणि वॉर्ड नं. २,३,५,१ मध्ये क्रमाने एक जागा स्त्रियांकरिता राखीव ठेवण्यात आली व वरील दुरुस्त घटनेप्रमाणे १५.८.१९४६ रोजी त्रैवार्षिक निवडणूका होऊन 'कराड बरो म्युनिसिपालिटीचे' पहिले बोर्ड ता.१ ऑगस्ट, १९४६ पासून अधिकारावर आले. एका वर्षापुरती अध्यक्ष-उपाध्यक्ष निवड आणि त्या सुमारात प्रतिवर्षी निर्माण होणारे चैतन्य ही बरो म्युनिसिपालिटीच्या घटनेतील वैशिष्टये होती.

मे. शिवराम रामराव चौगुले यांची बरो म्युनिसिपालिटीचे पहिले अध्यक्ष म्हणून निवड झाली. मे. गणपतराव बळवंतराव चव्हाण यांची दुस-या वर्षाकरिता अध्यक्षपदी निवड करण्यात आली. परंतु ते १५.१२.१९४७ रोजी कालवश झाल्याने दुस-या वर्षाच्या उरलेल्या मुदतीकरिता मे. गजानन विश्वनाथ उमराणी अध्यक्ष निवडले गेले. तसेच उपाध्यक्षपदी मे. सौ. वासंतिकाबाई वसंतराव दातार, मे. पन्नालाल गोपीलाल लाहोटी, मे. बाबुराव कृष्णाजी खराडे यांनी निवड झाली.

ता. १८.९.१९४९ रोजी दुसरी त्रैवार्षिक निवडणूक झाली. त्यावेळी १९२६ सालापासून वेगळा काढलेला मुसलमान मतदार संघ रद्द होऊन रविवार पेठेचा नवीन सहावा जनरल वॉर्ड बनविणत आला आणि मुसलमानांसाठी मंगळवार वॉर्डात-१,

गुरुवार वॉर्डात-२ व रविवार वॉर्डात -१ अशा ४ राखीव जागा ठेवल्या गेल्या. या फरकामुळे सभासद संख्या २३ झाली.

आतापर्यंत प्रत्येक वॉर्डातील मतदारास त्या वॉर्डातून निवडन द्यावयाच्या सभासद संख्येइतकी मते मर्जीप्रमाणे देण्याची मुभा होती ती यावेळी काढून घेण्यात येऊन एका उमेदवारास एकापेक्षा अधिक मते देऊ नयेत असा मतदानावर निर्बंध घालण्यात आला.

१.११.१९४९ रोजी दुसरे बोर्ड सत्तेवर आले, ते १९५२ पर्यंत होते. मे. आत्माराम नारायण जाधव, मे. रामबिलास किसनलाल लाहोटी, मे. श्रीकृष्ण महादेव कुलकर्णी हे अध्यक्षपदी रुजू झाले.

**चीफ ऑफिसर -**

श्री अनंत सखाराम विद्वांस १९४७ पर्यंत व श्री श्रीपाद रामचंद्र देशपांडे १९४७ पासून.

नगरपालिकेच्या २३ जागांपैकी २ जागा हरिजनांकरिता व दोन जागा स्त्रियांकरिता राखीव ठेवण्यात आल्या. १९५० सालच्या प्रौढ मतदान कायद्याखाली प्रत्येक नागरिकास मतदानाचा हक्क प्राप्त झाल्याने शेकडा पंचेचाळीस % लोकांना मतदानाचा हक्क मिळाला. १९५२ साली झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीच्या वेळी शहरातील मतदारांची संख्या ११,३४९ होती.

नगरपालिकेची त्रैवार्षिक निवडणूक २.११.१९५२ रोजी तिसरे बोर्ड अस्तित्वात आले. मे. प्रभाकर लक्ष्मण करंबळेकर, मे. पांडुरंग दादासो पाटील, मे. आब्बास फरीदसो मुतवल्ली हे नगरपालिकेचे अध्यक्ष झाले.

या बोर्डातील सभासदांची निवड तीन वर्षाकरिता झालेली होती. १९५४ साली म्युनिसिपल बरोज ॲक्टमध्ये दुरुस्ती होऊन बरो म्युनिसिपालिटीच्या सभासदांच्या ऑफिसची मुदत चार वर्षे झाली. त्यामुळे हे बोर्ड १९५६ पर्यंत अस्तित्वात होते.[२७]

**बारावा टप्पा - (१९५५ ते १९९३)**

सरकारी ठराव लो. से. ग. आर.सी.एन. २७५६ (३) १५.५.१९५६ ने नगरपालिकेची पुर्नघटना मंजूर झालेली आहे. त्याप्रमाणे वॉर्डवार सीटसची संख्या व रिझर्वेशन ठेवणेत आली.

वॉर्ड नं.२ मध्ये दोन जनरल व एक राखीव (हरिजन) असे एकूण तीन सीट १९५१ चे खानेसुमारीप्रमाणे वॉर्ड नं.२ ची लोकसंख्या ४०८३ असून १९५७ ची मतदार संख्या २०८३, पुढे त्या वॉर्डात एक सीट वाढवली. वॉर्ड ४,५ व ६ या तीन वॉर्डांच्या गटात एक स्त्री सीट, वॉर्ड नं. ४ मध्ये १९४६ पासून एक राखीव सीट होती. पण वॉर्ड ५ मध्ये राखीव स्त्री सीट दिली नाही.[२८]

नगरविकास सार्वजनिक आरोग्य खातेकडील सर्क्युलर्स क्र. एम.यू.एन. ४२६४/२३६१/अे ता. १ मार्च, १९६५ सांगितलेल्या मार्गदर्शक तत्वांना अनुसरुन कराड नगरपालिकेची एक सदस्य मतदार संघावर आधारलेली पुर्नघटना तयार करणेत आली. त्याची वैशिष्टये पुढीलप्रमाणे तयार करणेत आली.

१. नगरपालिका ब वर्गात मोडते.

२. लोकसंख्येच्या प्रमाणात या नगरपरिषदेमध्ये २४ लोकनियुक्त सभासद राहणेचे आहेत.

३. नगरपालिकेच्या एकूण क्षेत्राची विभागणी २४ वॉर्ड एक सदस्य अशी आहे.

४. १९६१ जनगणनेनुसार शहर लोकसंख्या ३३,७७२ आहे. त्यामुळे २४ पैकी प्रत्येक वॉर्डात सरासरी लोकसंख्येचे प्रमाण १४०७ राहील.

५. शहरातील अनुसूचित जातीची व जमातीची लोकसंख्या एक सदस्य वॉर्डाच्या सरासरी लोकसंख्येपेक्षा कमी असल्याने त्याच्यासाठी राखीव जागा ठेवण्यात आलेल्या नाहीत.

६. एकूण लोकनियुक्त सभासद संख्येच्या १०% म्हणजे दोन जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवल्या आहेत.[२९]

प्रत्येक वॉर्डातून एकच सभासद निवडायचा हा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ तरतूद आहे. प्रत्येक मतदाराला एकच मत देता येईल.

सन १९७४ च्या कायद्याने अध्यक्ष मतदारांनी निवडून द्यावयाची तरतूद झाली. पण पुढे बंद करुन नगरसेवकांनी निवडून द्यावयाचा असे ठरले. अनुसूचित जाती, भटक्या विमुक्त जाती यांचे कल्याणकारी योजना आखण्याची जबाबदारी नगरपालिकेवर टाकली. मतदारांची वयोमर्यादा १८ व उमेदवारांची २१ वर्षे करणेत आली.[३०]

१९५६ साली झालेल्या नगरपालिका निवडणूकीत १८ सदस्य होते. पैकी २ स्त्री राखीवसाठी जागा होत्या. यावेळी नगराध्यक्ष मा. पी.डी. पाटील होते. बॉम्बे म्युनिसीपल बरोज अॅक्ट कलम १९ (१) अन्वये अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची मुदत ठरविणेत आली.[३१]

१९६२-६३ साली पुन्हा नगरपालिका निवडणूक झाली. बॉम्बे म्युनिसीपल बरो अॅक्ट कलम १९अ (१) तरतुदीनुसार मे. कलेक्टर साहेबांनी पहिली सभा

बोलविली. तेंव्हा नगरपालिकेत निवडून आलेले २७ सदस्य हजर होते. पैकी ३ जागा ३० टक्केप्रमाणे स्त्रियांसाठी राखीव होत्या व एकूण २७ वॉर्ड होते.[३२]

१९६६-६७ साली नगरपालिकेची निवडणूक झाली. तेंव्हा २६ सदस्य संख्या होती. पैकी ३ स्त्रिया - यशोदा वाटवे, इंदिरा वि. पाटील, हशमद बी. युसूफ मुल्ला यांची स्त्री राखीव जागेवर निवड झाली.[३३]

१९७४-७५ साली झालेल्या निवडणूकीत सदस्य संख्या ३८ होती. यात स्वीकृत सदस्य - ३ व स्त्री राखीव - ३ जागा होत्या. अध्यक्ष मा.पी.डी. पाटील होते.[३४]

सन १९८१ ते १९८५ साली नगरपालिका बरखास्त झाली.

त्यानंतर सन १९८५-८६ साली नगरपालिका निवडणूक झाली. तेंव्हा एकूण ४१ सदस्य होते, पैकी ३ स्वीकृत व २ स्त्री राखीव होते.[३५]

सन १९९०-९१ साली निवडणूक झाली, त्यात निवडून आलेल्या प्रत्येक वॉर्डातून १ याप्रमाणे ४१ सदस्य होते. यात ३ सीट स्त्री राखीव व ३ स्वीकृत सभासद होते.[३६]

वरील सर्व कालखंडात १९५३ ते १९५५ व पुढे १९५६ ते १९९३ या प्रदीर्घ कालखंडात नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून मा. पी.डी. पाटील यांनी अध्यक्ष स्थान भूषविले होते. ही कराड नगरपालिकेच्या इतिहासातील आश्चर्य व्यक्त करणारी घटना आहे हेच या कालखंडाचे महत्व आहे.

**स्वीकृत सभासद -**

लोकशाही कारभारात निवडणूक हे महत्वाचे साधन आहे. पण सर्वांना निवडणूक पसंत पडेलच असे नाही. त्यासाठी स्वीकृत सभासद तरतुदीने स्वीकृत

सभासद घेतले जातात. स्वीकृत सभासद संख्या एकूण निवडून आलेल्या सभासदांच्या शेकडा दहा टक्के जास्तीत जास्त असतील. १९७४-७५ सालच्या निवडणूकीपासून ३ स्वीकृत सदस्य घेणेत आले.[३७]

**प्रशासकीय कालावधी -**

सन १९३८ पासून संपूर्णपणे लोकनियुक्त सदस्यांकडून नगरपालिका कारभार चालू झाला. तो पुढे तसाच चालू राहिला. पण काही अडचणींमुळे अगर कायदेशीर अडचणींसाठी नगरपालिकेवर सरकार नियुक्त प्रशासकाची नेमणूक केली. सन ६.२.१९८१ ते ८.११.१९८१ साली श्री आनंद आबाजी भिसे यांची नगरपालिकेचे प्रशासक म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर सन ९.११.१९८१ ते १७.१२.१९८२ ला भाऊसाहेब विठ्ठलराव शितोळे यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाली. वसंतराव कृष्णाजी देशपांडे यांची १८.१२.१९८२ ते १९.१२.१९८३ रोजी नियुक्ती झाली. भाऊसाहेब विठ्ठलराव शितोळे यांची पुन्हा २०.१२.१९८३ ते ३१.७.१९८४ रोजी नियुक्ती झाली. तसेच बापूराव आनंदराव गोडसे यांची १.८.१९८४ ते १४.१२.१९८५ पर्यंत प्रशासक म्हणून नियुक्ती झाली.

अशाप्रकारे कराड नगरपालिकेवर १९८१ ते १९८५ या कालावधीत एकूण ५ प्रशासकांची नियुक्ती सरकारमार्फत करणेत आली होती.[३८] तसेच १८८५ ते १९९३ पर्यंत लोकनियुक्त नगराध्यक्ष २२ होऊन गेले.

**नगरपालिका प्रशासन -**

नगरपालिकेच्या वाढ आणि विकासासाठी नगरपालिका प्रशासन ही एक महत्वाची गोष्ट मानली जाते. कारण कोणत्याही संस्थेचा विकास हा तिच्या कार्यक्षम व सदोष प्रशासन यंत्रणेमुळेच होत असतो. प्रशासन यंत्रणा जर योग्य असेल तर अनेक

लोकोपयोगी कामे पार पाडली जातात. नगरपालिका प्रशासन यंत्रणेचा तर थेट संबंध या गोष्टीशी असतो. कारण सार्वजनिक आरोग्य, शहर स्वच्छता, रस्ते, बांधकाम, पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा, दिवा बत्ती सोय ही प्राथमिक कामे नगरपालिकेकडून केली जातात. त्याचप्रमाणे दुय्यम दर्जाची कामेही प्रामुख्याने लोक प्रतिनिधींच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतात. थोडक्यात स्थानिक लोकांच्या सामाजिक, सांस्कृतिक, शारीरिक, मानसिक विकासाची गुरुकिल्ली म्हणजेच स्थानिक स्वराज्य संस्था होय.[१९]

प्रशासन यंत्रणा सुरळीत व सुनियंत्रित चालविण्यासाठी वेगवेगळया विभागाची निर्मिती करुन ती ती कामे त्या विभागाला चोखपणे पार पाडावी लागतात. आरोगय विभागाकडून सार्वजनिक आरोगयावर परिणाम करणा-या घटकांचा शोघ घेवून लोकांना चांगल्या आरोग्य सेवा पुरविल्या जातात. साथीच्या रोगाचा प्रसार थांबविला जातो. साथीचे आजार होऊ नयेत म्हणून प्रतिबंधात्मक उपाययोजना केली जाते. शहरातील केरकचरा गोळा करुन शहर स्वच्छतेविषयी दक्षता घेतली जाते. बांधकाम विभागामार्फत रस्ते दुरुस्ती व बांधणी, अनेक इमारतीचे बांधकाम केले जाते. याशिवाय रस्त्यावर दिवा बत्ती सोय, आपत्तीच्या वेळी लोकांची सुटका, नियमित व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, शहराअंतर्गत वाहतूक योजना, स्वस्त धान्य दुकानातून लोकांना अन्नधान्याचा पुरवठा करणे या गोष्अी भौतिक सुधारणांमध्ये येतात व त्या त्या विभागांमार्फत पार पाडल्या जातात तर सांस्कृतिक विकासामध्ये शहर रचना लोकांच्या मनोरंजनासाठी बागा, प्राणी संग्रहालय, पोहणे, तलाव, वस्तु संग्रहालय, ग्रंथालय इ. गोष्टींचा समावेश होतो.

नगरपालिकांची सेवा व कार्यक्रमाची परिणामकारकताही ती कोणत्या पध्दतीने राबवली जाते यावर बरीच अवलंबून असते. नगरपालिकेकडील लोकनियुक्त

प्रतिनिधींनी एखादा कायदा पास केला, नंतर एखादे धोरण ठरविले, नंतर त्या कायद्याची किंवा धोरणाची अंमलबजावणी करणेचा महत्वाचा प्रश्न नगरपालिका प्रशासनावर येऊन पडतो. टेड ऑर्ड वे यांच्या मतानुसार 'प्रशासन नैतिक कायदा आहे आणि प्रशासक म्हणजे नैतिकतेचे प्रतिनिधी आहे'.[४०]

नागरी सेवेचे महत्व विषद करताना हेरमन फिनार म्हणतात की पुरेसे संघटन ही राजकारणाची एक बाजू झाली तरी आपले राजकीय तत्वज्ञान आणि उच्च प्रतीचे नेतृत्व हे कर्मचारी वर्गांनी केलेल्या पोहोच पावतीशिवाय आणि परिणामकारक अंमलबजावणीशिवाय कुचकामी ठरते आणि म्हणूनच नेतृत्वाबरोबर कर्मचा-यांना सुध्दा तेवढेच महत्वाचे स्थान आहे.[४१]

कराड नगरपालिका प्रशासन व त्यांनी केलेल्या कामगिरीचा सन १८५५ ते १९९३ पर्यंतचा आढावा पुढीलप्रमाणे -

१५ सप्टेंबर, १८५५ साली कराड नगरपालिकेची स्थापना झाली, तेंव्हा नगरपालिकेची प्रशासन यंत्रणा ही लोकनियुक्त नव्हती तर ती यंत्रणा सरकारकडून चालविली जात असे व सरकारकडून लोकप्रतिनिधींची निवड केली जात असे. नगरपालिका अध्यक्ष म्हणून सरकारी अधिका-यांची नेमणूक सरकारच करत असे. हे सरकारी अधिकारी वेळोवेळी भेटी देवून नगरपालिका कर्मचा-यांना सूचना देत असत व त्यानुसार सूचनांची अंमलबजावणी नगरपालिका कर्मचारी करत असत. कराड नगरपालिकेचा सुरुवातीचा कर्मचारी वर्ग १३ होता. त्यानंतर त्यात हळूहळू वाढ होत गेली. १८५८ साली १६ कर्मचारी होते.

**नगरपालिका ऑफिस -**

नगरपालिका स्थापनेनंतर अधिकारावर आलेल्या कमेटीचा कारभार चावडीच्या इमारतीत सुरु झाला. सदरची इमारत पडीक असल्याने ती सन १८५६ साली

नगरपालिकेने मुख्यतः कमेटीचे फंडाचे पैशातून नवीन बांधली. बांधकामास ४६८ रु. कमेटी फंडातून, ७५ रु. नागरीकांची मदत, २५ रु. सरकारातून असा एकूण ५६८ रु. खर्च आला.

तसेच ऑफिसमध्ये तास समजण्यासाठी सन १८५८ साली १ रु. ८ आणे किंमतीचे एक वालुका यंत्र खरेदी केले.

नगरपालिकेच्या स्थापनेबरोबर जकात छापा (कापडावर शिक्के मारणे) व तपकीर खोती एवढेच अप्रत्यक्ष कर वसूल करण्याचा अधिकार नगरपालिकेस मिळाला. ते वसूल करण्याचा मक्ता लिलावाने दिला जात असे. जकातीचा रिवाजपट (दर) १५ सप्टेंबर, १८५५ रोजी मंजूर होऊन आला.

**दिवाबत्ती सोय -**

दि. ३०.१२.१८५७ पासून नगरपालिकेने प्रथमच शहरातील रस्त्यावर प्रमुख ठिकाणी उजेडाची सोय केली. त्यासाठी एकूण २२ कंदील खरेदी करण्यात आले. हे कंदील महिन्यातून १६ दिवस अंधा-या रात्री लावत. प्रत्येक कंदीलाचा दरमहा खर्च अकरा आणे असे.

**घरपट्टी -**

१८७० सालापर्यंत नागरीकांवर कोणताही कर नगरपालिकेने बसविलेला नव्हता. या साली मात्र कृष्णा कॅनॉलचे पाणी नळाने गावात आणणे ही शहर सुधारणेची मोठी योजना नगरपालिकेपुढे असल्याने ती प्रतयक्षात आणण्याकरिता नवीन कर बसवून उत्पन्न वाढविण्याची नगरपालिकेस जरुरी भासली. म्हणून ता. १८.५.१८६८ च्या जनरल सभेत शहरातील घरावर घरपट्टी बसविणेचा निर्णय

नगरपालिकेने घेतला आणि या निर्णयाची पूर्तता करणेचे सर्व अधिकार मॅनेजिंग कमेटीकडे सोपविले.

हे काम सोईचे व्हावे म्हणून मॅनेजिंग कमेटीने प्रथम ता.२२.७.१८६८ रोजी ठराव करुन शहरातील पेठांच्या हद्दी निश्चित केल्या. त्यानंतर घरांची पेठवार मोजदाद केली व प्रतवारी ठरविली.

पहिल्या प्रतीच्या घरावर वार्षिक घरपट्टी ४ रु., दुसरी प्रत २ रु., तिसरी प्रत - १ रु. व चौथी प्रत ८ आणे या प्रमाणात सन १८७१-७२ सालापासून घरपट्टी आकारणी करुन वसूलीस सुरुवात केली.

## घरपट्टीचे पहिले आकारणीपत्रक

## सन १८७१-७२

| पेठ | प्रत | | | | नादार | देऊळ धर्मशाळा सरकारी इमारत | एकूण इमारती |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | | |
| सोमवार | ८९ | १०५ | ११८ | ६१ | १४ | २५ | ४७२ |
| मंगळवार | १२ | ५८ | ७५ | १४ | १३ | ४ | १७६ |
| बुधवार | - | ४ | ३१ | ६० | ८ | २ | १०५ |
| गुरुवार | ४६ | १३२ | ६८ | ६६ | २२ | ७ | ३४१ |
| शुक्रवार | ११ | २०१ | ५० | २९ | १० | २ | ३०३ |
| शनिवार | ३४ | ६२ | २८ | २ | १ | ४ | १३१ |
| रविवार | ८० | १७० | ६६ | १० | ३ | ७ | ३३६ |
| मलकापूर | ४ | ७ | २८ | २७ | ४ | १ | ७१ |
| एकूण घरे | २३६ | ७३९ | ४६४ | २६९ | ७५ | ५२ | १८३५ |
| आकारणी रु. | ९४४ | १४७८ | ४६४ | १३४८० | - | - | ३०२० -८० |

नगरपालिकेने घरपट्टी आकारणी सोईची जावी म्हणून पेठवार नंबर घातले.

सन १९२२-२३ सालापर्यंत घरपट्टीची आकारणी घराच्या किंमतीवर केली जात असे. रु. आठ ही त्या आकारणीची कालमर्यादा ठरलेली होती. ही पध्दत बंद करुन घरभाडयावर घरपट्टी बसवावी या सरकारी सूचनेस अनुसरुन नगरपालिकेने ता.१०.१२.१९२० रोजी ठराव केला व रेन्टल व्हॅल्युएशन बेसीस वर घरपट्टीच्या दराचे पुढीलप्रमाणे शेडयूल मंजूर केले -

| | वार्षिक घर भाडे | घर पट्टीचा दर |
|---|---|---|
| १. | ५ रु. | माफ |
| २. | ६४ रु. | रुपयास एक आणा |
| ३. | ६५ ते १०० रु. | दरमहा रुपयास आठ आणा |
| ४. | १००रु. वर | दर बारा रुपयास एक रुपया |

वरील पध्दतीच्या घरपट्टीच्या आकारणीस १९२३-२४ साली सुरुवात झाली. तिचा अंमल १९५२ अखेर पर्यंत राहिला.

घरपट्टी भाडेतून नगरपालिकेस १९८१-८२ साली रु.३,००,०००/- मिळाले. तसेच १९९२-९३ साली रु.७,३३,०२५/- मिळाले.[४२]

**मुख्याधिकारी -**

नगरपालिका कारभारात अध्यक्षाच्या अधिकारतेस पात्र राहून नगरपालिकेच्या कार्याची प्रशासकीय अंमलबजावणी करणारा मुख्य कार्यकारी अधिकारी आहे. त्याचा दर्जा साधारणतः मामलेदार दर्जाचा असून योग्य पगारावर त्याची नेमणूक केली जाते. नगरपालिका ठरावाची अंमलबजावणी करणारा तो मुख्य प्रशासकीय अधिकारी आहे. त्याच्या हाताखाली इतर नगरपालिका कर्मचा-यांनी कामे करावयाची असतात.

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम ॲक्ट, १९६५ कलम ७५ मध्ये मुख्याधिकारी पात्रतेचे नियम शासनाने केले आहेत. नगरपालिकेच्या आर्थिक, दैनंदिन प्रशासकीय कामावर देखरेख ठेवणे, अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे, ते स्थायी समितीस सादर करणे, नगरपालिका पैसा, मालमत्ता, संबंधात लबाडी, अपहार, चोरी, भ्रष्टाचार सर्व प्रकरणे अध्यक्ष व संबंधित समितीस कळविणे. नगरपालिका कर्मचारी हलगर्जीपणा दुर्लक्ष, गैरवर्तन इ. वर्तन केल्यास त्यांना शिक्षा करणचा अधिकार आहे.

मुख्याधिका-यांची बदली एका नगरपालिकेतून दुस-या नगरपालिकेत केली जाते. त्या वर्गाच्या न.पा. नुसार पगाराची श्रेणी ठरविण्याची या कायद्यानुसार तरतूद आहे. हा कायदा अंमलात येण्यापूर्वी प. महाराष्ट्र कायद्याच्या तरतूदीनुसार मुख्याधिकारीही नगरपालिकेचा नोकर नोकरीस लागल्यापासून त्या नगरपालिकेत सेवानिवृत्त होईपर्यंत रहात असे.[४३]

सन १९४७ ते १९९३ पर्यंत एकूण १६ मुख्याधिकारी कराड नगरपालिकेत होऊन गेले.[४४]

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अनंत सखाराम विद्वांस | - | १९४७ |
| २. | श्री श्रीपाद शंकर देशपांडे | - | १९४७-१९७४ |
| ३. | श्री आण्णासो हरिबा लोणारी | - | १९७४-१९७६ |
| ४. | श्री गणपती बळवंत सकटे | - | १९७६-१९७८ |
| ५. | श्री अनंत आबाजी भिसे | - | १९७८-१९८२ |
| ६. | श्री शामराव बापूसो ससे | - | १९८२-१९८४ |
| ७. | आय. सी. पाटील | - | १९८५-१९८६ |
| ८. | श्री एस. डी. भिसे | - | १९८६-१९८८ |
| ९. | श्री शरद सुदामे | - | २६.४.१९८८- १.६.१९८८ |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | श्री लक्ष्मण अ. लटके | - | १९८८-१९८९ |
| ११. | श्री पी.डी. कोळेकर | - | १९८९-१९९१ |
| १२. | श्री वाय. बी. माळी | - | १९९१-१९९२ |
| १३. | श्री एस. एस. खैरमोडे | - | ४.७.१९९२- १३.१२.१९९२ |
| १४. | श्री डी.एस. पायगुडे | - | १९९२-१९९३ |
| १५. | श्री अे.एम. चव्हाण | - | ५.१.१९९३- १४.४.१९९३ |
| १६. | श्री लक्ष्मण बाबूराव सावंत | - | १५.४.१९९३ |

मुख्याधिकारी हा नगरपालिकेचा प्रमुख प्रशासकीय अधिकारी असल्याने त्याच्या कार्यक्षमतेवर नगरपालिकेचा विकास अवलंबून असतो. लोकप्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणेचे काम त्याचे असते. त्यामुळे लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांचे संबंध सलोख्याचे असतील तर त्यांनी घेतलेल्या निर्णयाची योग्य अंमलबजावणी होऊन लोकांना नगरपालिका अधिक चांगली सेवा देऊ शकते. जर एखादा अधिकारी भ्रष्ट निघाला व लोकप्रतिनिधी व मुख्याधिकारी यांच्यात बेबनाव निर्माण झाला तर त्याची फळे जनतेला भोगावी लागतात. म्हणून नगरपालिकेचा मुख्याधिकारी कार्यक्षम व दक्ष असला पाहिजे तर नगरपालिका प्रशासन सुनियंत्रित चालते.

**इतर प्रशासकीय कर्मचारी -**

मुख्याधिकारी यांना नगरपालिका प्रशासन कामकाजात मदत करणेसाठी व सहकार्य करणेसाठी इतर अधिकारी व कर्मचा-यांची नेमणूका केलेल्या असतात. ती खाती खालील प्रमाणे -

१. (दवाखाना) सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता

२. बांधकाम खाते

३. पाणी पुरवठा खाते

४. कर विभाग

५. नगदी खाते

६. लाईट खाते

७. अंर्तगत हिशेब तपासणी विभागणी

८. दप्तरखाना

९. फुड सेक्शन (धान्य वितरण विभाग)

१०. सामान्य प्रशासन विभाग

११. भांडार विभाग

१२. दुकान विभाग

१३. बाल शिक्षण विभाग

१४. नगरपालिका शिक्षण मंडळ

१५. नगरपालिका लायब्ररी

**सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता विभाग -**

कराड नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर लगेचच दुस-या वर्षी (१८५६) नागरिकांना औषधोपचाराची सोय व्हावी म्हणून नगरपालिकेने दवाखान्याची मागणी केली. या मागणीस १८६५ साली मूर्त स्वरुप येऊन नगरपालिकेचा दवाखाना स्थापन झाला. रामचंद्र दाजी हे नगरपालिकेच्या दवाखान्याचे पहिले डॉक्टर होते. १८७८ साली हॉस्पिटल असि. म्हणून हरि रघुनाथ बापट यांची नेमणूक करण्यात आली.

पुढे १९२८-२९ साली १२, ६२२,१०३ रु. खर्च करुन दवाखान्याची मुख्य इमारत बांधली. त्या लगत स्त्री-पुरुष पेशन्टसाठी दोन वॉर्ड बांधले. मेडिकल ऑफिसर

नेमला. त्याच्या पगारापैकी काही भाग फक्त नगरपालिकेस सरकारकडून ग्रँन्ट म्हणून मिळतो. दवाखान्याचा बाकी खर्च नगरपालिका करते[४५].

कराड म्युनिसिपल दवाखान्याचा इनचार्ज म्हणून नगरपालिकेचा स्वतःचा डॉक्टर असावा. या प्रपोजलला सरकारी ठराव लो. स.ग. व प.हे.डी.न.एम.एम.ई-२७५५ ता. १२-५-१९५५ ने मंजुरी आली.

१९५१-५२ साली म्युनिसिपल मेडिकल ऑफिसर डॉ. श्रावगे हे होते. १९५६-५७ साली डॉ. जी. के. कुलकणी यांची नियुक्ती झाली[४६].

आरोग्य विभागाकडे दवाखान्यातील मेडिकल ऑफिसरशिवाय सॅनि. इन्स्पेक्टर सिनिअर क्लार्क, लिपीक, ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वॉचमन, क्लिनर, सफाई कामगार, ड्रेनेज कामगार, इ. कर्मचारी वर्ग असतो. सॅनीटरी इन्स्पेक्टरला शहराची रोज पहाणी करणे, रोग उद्‌भवण्याची शक्यता असल्यास रिपोर्ट देणे, आरोग्य खात्यावर देखरेख ठेवणे, नियमांची अंमलबजावणी करणे, साथीचे रोग उद्‌भवल्यास तातडीने चौकशी करणे, जन्म-मृत्यु रजिस्टर अद्यावत ठेवणे, मार्केट खाटीक खाने यांची पहाणी करुन तेथे नेहमी स्वच्छता राहील अशी व्यवस्था करणे, शहरातील सार्वजनिक स्वच्छता गृहे व्यवस्था करणे इ. कामे पहावी लागतात[४७].

कराड नगरपालिका आरोग्य विभागामार्फत अनेक साथीचे निवारण करण्यासाठी योग्य ती जबाबदारी पार पाडली जाते[४८].

कुटुंब नियोजन केंद्रे व इतर केंद्रे चालविली जातात. याविषयी सविस्तर माहिती आपण प्रकरण नं. ३ मध्ये पाहिली आहे.

यानंतर मा. कमिशनरसाो, पुणे विभाग पुणे आदेशान्वये एम.बी.बी.एस. पदवी घेतलेल्या व्यक्तीची चिफ मेडिकल ऑफिसर म्हणून दरमहा ६०० रु. वेतनश्रेणी वर

नेमणूक करणेत आली. १९७३-७४ साली २४० रु. पगारावर सॅनिटरी इन्स्पेक्टरची नेमणूक करण्यात आली[४९].

कराड नगरपालिकेने १८६५ पासून १९६० पर्यंत आरोग्य विभागामार्फत नागरिकांची साथीच्या वेळी कसोसीने प्रयत्न करुन साथींना प्रतिबंध घातला. पण १९६० पासून शासकीय कुटीर रुग्णालय कराड मध्ये सुरु झाले. त्यामुळे नागरिकांच्या वैद्यकीय सेवेत मुलभुत सुधारणा झाली[५०].

या रुग्णालयास नगरपालिकेमार्फत अनुदान दिले जाते. तसेच आरोग्य विभागामार्फत शहर स्वच्छता, रस्ते सफाई, गटारे व संडास स्वच्छता या गोष्टीकडे जास्तीत जास्त लक्ष देण्यात आले.

**बांधकाम विभाग -**

नगरपालिका प्रशासनात या विभागाला महत्वाचे स्थान असते. या विभागाची सुरवात नगरपालिका स्थापनेपासून झाली आहे. कारण नगरपालिकेला जी लोकोपयोगी कामे पार पाडावी लागतात. त्या मध्ये या विभागाच्या कामाना महत्वाचे स्थान असते. या विभागामार्फत रस्ते बांधणी, धर्मशाळा, पाणी पुरवठा, मार्केट इ. बांधकामे पार पाडण्याचा उद्देश असतो. १८५७ साली नगरपालिकेमार्फत कराड-पंढरपूर व कराड विजापूर एक मैल रस्ता दुरुस्त करण्यात आला. त्यासाठी १७७-१२-० रु. खर्च आला[५१].

बांधकाम विभागात-इंजिनिअर १, बिल्डींग इन्स्पेक्टर, ओव्हरसिअर-४, ड्राप्समन, सिनिअर क्लार्क, लिपीक, मिस्त्री, गंवडी, ड्रायव्हर, मुकादम, शिपाई, वॉचमन, क्लिनर, माळी, बिगारी कामगार, नगररचना इन्स्पेक्टर, शिपाई अशी एकूण ५८ कर्मचारी कार्यरत असतात.

बांधकाम विभागाचे प्रमुख इंजिनिअर यांना ४८० रु. पगार व अलॉन्स रु. ५० प्रमाणे वेतनश्रेणी मंजुर करण्यात आली. तर महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग १७-५-८४ चे आदेशान्वये त्यामध्ये सुधारणा करुन १५०० रु. वेतनश्रेणी करण्यात आली. तसेच मुकादम व मेस्त्री या पदाकरिता अनुक्रमे मुळ पगार १६० व ७० अशा वेतन श्रेणीवर मंजुरी देणेते आली[५२].

**कर्मचा-यांना पार पाडावी लागणारी कामे -**

१. इंजिनिअर -

हाताखालील कर्मचा-याचे कामावर देखरेख ठेवणे व त्यांच्याकडून कामे करुन घेणे, मंजुर झालेल्या कामाची आखणी करुन लागणा-या मालाची व्यवस्था करणे, नगरपालिका इमारती रस्ते, गटारे, सार्वजनिक जागा, उद्याने सार्वजनिक संडास, मुता-या यांची जपणूक दुरुस्ती व दैनंदिन व्यवस्था पहाणे, टाऊन प्लॅनिंग ॲक्ट डेव्हलपमेंट प्लॅनची अंमलबजावणी इमारतींना परवानग्या देणे, रस्त्यावरील नगरपालिका हद्दीतील अतिक्रमणे दूर करणे.

बिल्डींग इन्स्पेक्टर -

टाऊन प्लॅनिंग स्कीम व गावठाण मधील इमारतीचे परवानगीची कामे पहाणे, बांधकामे चालू असताना ती नियमाप्रमाणे होतात की नाही पहाणे होत नसतील तर नोटिसा देणे, बिगरपरवाना बांधकामचे पंचनामे करुन मा. स्थायी समितीकडे पाठवणे, रस्त्यावरील अतिक्रमणे हटविणे, बिल्डिंग परमिशन रजिस्टर अद्यावत ठेवणे, इंजिनिअर चीफ ऑफिसरने सांगितलेली कामे करणे.

ओव्हरसियर -

बांधकाम प्लॅन्स एस्टिमेट तयार करणे, कार्यालयाची देखभाल करणे, टाऊन प्लॅनिंग स्कीमची अंमलबजावणी त्यांनी करणेची आहे. स्कीम नं. १ मध्ये रस्ते आखणे वगैरे कामे करणे. स्कीम नं.२ अभ्यास करुन स्कीमचे लवादाशी संपर्क साधणे खात्यामार्फत होणारे कामाची मापे घेणे ती नोंदवणे, मस्टर प्रमाणे काम चेक करणे रस्ते रुंदीच्या ड्राफ्टमनशी तयार केलेल्या केसेस चेक करणे[११].

**या विभागाने केलेली कामे -**

१. रस्ता -

नगरपालिकेच्या प्राथमिक कर्तव्याचा एक भाग म्हणजे रस्ते होय. या बाबतीत नगरपालिका स्थापन झाल्यापासून लक्ष दिलेले दिसते. सुरुवातीस शहरात एकूण चार मैल लांबीचे रस्ते होते, रस्त्यांची रुंदी पाच ते पंधरा फुटापर्यंत होती. चावडीपासून शनिवार पेठेतून कोल्हापूरकडे दक्षिण महाराष्ट्रात जाणारा मुख्य रस्ता होता. रस्त्याची दुरुस्ती मुरुमाने केली जाई. १८५७ साली कराड-पंढरपूर व कराड विजापूर एक मैल रस्ता दुरुस्त केला त्यास १७७-१२-० खर्च आला.

सन १८६२-६३ साली नगरपालिकेने १६७३ रु. खर्च करुन शहरातील प्रमुख रस्ते मुरुमाने दुरुस्त केले. १८५९ साली रस्ते दुरुस्तीसाठी मुरुम बसविणेस एक दगडी रुळ ४८-१-६ रु. खरेदी केला. तसेच १८९३ साली कराड-नागज, कराड-कोल्हापूर व कराड-चिपळूण असे तीन मोठे प्रॉव्हिन्शियल रोड दुरुस्ती या कामी नगरपालिकेने निम्मी रक्कम रु. ३५०० भरली.

रस्त्यावरील अतिक्रमणे काढण्याच्या कामास नगरपालिकेने १९२७-२८ साली सुरवात केली जवळ जवळ २७ अतिक्रमणे काढून टाकली.

१८८० साली नगरपालिकेने रस्तो दुरुस्ती व नवीन रस्तो तयार करण्याच्या कामावर १९,९७७-९-७ रु. खर्च केले.

शहराच्या अनिर्बंध वाढीमुळे शहरातील रस्ते अरुंद होते. म्हणून नगरपालिकेने 'शहर सुधारणेचा नकाशा' तयार करण्याचे काम १९४६ साली मे कन्सल्टिंग सर्व्हेअर, पुणे यांच्याकडे सोपविले. त्यांनी कराड शहर सुधारणेचा नकाशा (मास्टर प्लॅन नं. ८१/१९४८) तयार केला. सदर प्लॅनप्रमाणे रस्ते करण्याच्या कामास नगरपालिकेने १९५१-५२ सालापासून सुरवात केली. सदर कामास नगरपालिकेने २८ हजार रु. खर्च केले.

म्युनिसिपल रस्त्यावरील अतिक्रमण काढून टाकण्यासाठी १९५१ साली एनक्रोचमेंट ऑफिसरखी मदत सरकाने नगरपालिकेस दिली.

रस्ते रुंदी करणाच्या कार्यक्रमास नगरपालिकेने अग्रक्रम दिला आणि त्या कामाचा १९५५ सालापसून सातत्याने व नियोनजबध्द पाठपुरावा करुन मास्टर प्लॅनप्रमाणे रस्त्याच्या रुंदीकरणाचे व नवीन रस्ते बांधण्याचे काम ९९% पूर्ण केले. कराड नं. पा. ने रस्ते रुंदी केलेले हे सर्वात महत्वाचे व पायाभूत काम आहे. त्यामुळेच केवळ नगरपालिकेस शहर सुधारणेची इतर कामे हाती घेता आली.

१९५४-५५ साली रस्ते रुंदी करणासाठी ८६,००० खर्च आला[५४].

डांबरी रस्ता -

शहरातील पहिला डांबरी रस्ता पटेल चौक ते चावडी चौक ते मंगळवार वेस सन १९५४ साली झाला. व तेव्हापासून दरसाल डांबरी रस्त्याच्या कामाचा कार्यक्रम राबवून सार्वजनिक बांधकाम आणि गृहनिर्माण उपविभाग, कराड यांचेकडून आलेले पत्र व मा. विकास नियोजन समितीचा ठराव ८/११५ दि. ३०-८-१९७६ आलेले

शिफारस सर्व कागदपत्रे पाहून नगरपालिकेच्या हद्दीतून जाणा-या रस्त्याची देखभाल व दुरुस्ती अप्रत्यक्षपणे नगरपालिकेवर पडते[५५].

सन १९५३-५४ साली १५.५० कि. मी. लांबीचे कच्चे खाडीचे रस्ते होते. डांबरी रस्ते ३५-६९ कि. मी. खडीचे २.६१ कि. मी. व मुरुमांचे १.१४ कि. मी. असे होते. तर १९९३ साली ३९.३४ कि. मी. लांबीचे रस्ते आहेत[५६].

टाऊन प्लॅनिंग -

१९१० साली शहराची लोकसंख्या दहा हजाराच्या वर गेली. विसाव्या शतकाच्या सुरवातीस त्या भागात वसाहती व व्यापार धंद्यात वाढ झाली. १८५५ साली ठरलेल्या मर्यादेबाहेर शहराची वाढ झाली. म्युनिसिपल हद्दीत सामावून घेण्यासाठी नगरपालिकेने प्रयत्न केल्यावरुन सरकारी ठराव नं. २३१५ १ मार्च, १९१० ने शहराच्या मर्यादा वाढवण्यात आल्या[५७].

जनरल डिपार्टमेंट नं. ४१८६/३३ ता. १२-१२-१९४० ने कायम करणे व त्या नंतर शहराच्या वाढीस वाव मिळावा म्हणून कराड नगरपालिकेने टाऊन प्लॅनिंग स्कीमची आखणी केली[५८].

टाऊन प्लॅनिंग स्कीमची हद्दीनुसार शहराच्या हद्दी वाढविणेचे काम नगरपालिकेने जा. नं. १४०० ता. २६-११-१९५५ सरकारकडे पाठवले. त्यानुसर सरकारी ठराव लो. से.ग.व.प.हे.डि.नं (३) ई ता १५-५-१९५६ आर.सी.एन. २७५६ मंजुरी मिळाली.

या योजनेच्या पूर्ततेसाठी श्री बी. टी. तालीम यांची अर्बिट्रेटर म्हणून १९५५ साली नेमणूक झाली[५९].

त्यानंतर १९६४ साली टाऊन इंप्रूव्हमेंट म्हणून बाबूराव थोरवडे यांची नेमणूक झाली. टाऊन डेव्हलपमेंट कामाची अंमलबजावणी करण्यासाठी १ मुकादम, ४ बिगारी गटार सफाई, ४ रस्ते झाडूवाले, २ भंगी नेमण्यात आले[६०].

१९६५ साली पंच्चावन लाख खर्चाची गटार योजना हाती घेऊन पूर्ण करणेत आली.[६१]

पाणी पुरवठा -

शहराला स्वच्छ पाणी पुरवठा करणे ही नगरपालिकेची प्रथम क्रमांकाची प्राथमिक जबाबदारी आहे. परंतु नगरपालिका स्थापन झाली त्यावेळी शहरात पाणी पुरवठयाची कसलीही योजना अस्तित्वात नव्हती. लोकांना कृष्णा-कोयना नद्याचे पाणी वाहून आणावे लागत असे. तेंव्हा नगरपालिकेने उन्हाळयात नदीच्या पात्रातील वाळूच्या दुतर्फा कळक रोपून कडबा पेंढया लावून सावली केली व पाणी पुरवठा या महत्वाच्या प्रश्नाकडे नगरपालिकेने लक्ष वळविले व नदीवर १८६२ साली रखवालदार नेमला. तथापि पाणी पुरवठयाची योजना अत्यंत खर्चाची असल्याने त्या बाबतीत १८६६ पर्यंत नगरपालिका काहीही करु शकली नाही. पुढे कृष्णा कॅनॅलच्या पाण्याचा उपयोग कराड शहर पाणी पुरवठासाठी करुन घेण्याची एक अभिनव योजना पालिकेने आखली १८६७ साली पूर्ण केली. ही पाणी पुरवठयाची पहिली महत्वाची योजना होय. यासाठी २२५७२-१०-० खर्च आला. १८७५ पासून शहर पाणी पुरवठयासाठी नगरपालिकेस सरकारकडून लोकल फंडापैकी दरसाल ५६० रु. मिळाले[६२].

**राज्यातील पहिली जलशुध्दीकरण योजना कराडमध्ये -**

सुरुवातीस कृष्णा कॅनॉलचे पाणी तलावाच्या व नळाच्या सहाय्याने शहरात जागोजाग बांधलेल्या हौदामध्ये ग्रॅव्हीटेशनने आणले होते. त्या योजनेत अनेक दोष

होते. तिच्या पाण्याचा वापर फक्त सहा महिनेपर्यंत आणि तीही एक चतुर्थांश वस्तीपुरता मर्यादित असे. पाणी स्वच्छ करणची कसलीही तरतूद नसल्याने त्या पाण्यामुळे महामारीसारखे रोग उद्‌भवत. पहिल्या योजनेतील पाणी पुरवठा अपुरा, अस्वच्छ व अनिश्चित असल्यामुळे नागरीकांचे हाल कमी झाले नव्हते. तेंव्हा आधुनिक पध्दतीची व व्यापक स्वरुपाची पाणी पुरवठा योजना आखणे, शहराच्या वाढत्या विस्ताराच्या दृष्टीने महत्वाचे होते. तथापि अशा प्रकारची योजना अतिशय खर्चाची व कुवतीबाहेरची होती. तरीही १९१० पासून नगरपालिकेने तिचा पाठलाग केला."[५४]

या नवीन योजनेसाठी कोयना नदीच्या किना-यावर शुक्रवार पेठेत वॉटर वर्क्स बांधण्याकरिता जागा घेतली. सॅनिटरी इंजिनिअर, मुंबई सरकार यांनी नव्या योजनेचे तयार केलेले प्लॅन्स व एस्टीमेट रक्कम ३,५१,२३४/- सरकारी ठराव पी.डब्लू.डी.ए. ३४८० ता.१०.४.१९१२ ने मंजूर झाले व अवघ्या आठ वर्षात १९१८ साली पूर्ण झाली. ही महाराष्ट्रातील पहिली जलशुध्दीकरण योजना (ग्रामीण) होती. या योजनेला सरकारने निम्मी रक्कम अनुदान व उरलेली पालिकेस कर्ज म्हणून दिली.

या योजनेने स्वच्छ व भरपूर पाणी पुरवठा होऊ लागला. गरीब वस्तीत १८ सार्वजनिक नळाची सोय केली.

या नवीन योजनेसाठी झालेल्या कर्जाचे हप्ते थकलेले होते. ते भागवून वॉटर वर्क्सचा नित्य नियमित मेंटेनन्स खर्च भागवून वॉटर वर्क्स ताब्यात घेणे, नगरपालिकेच्या अवाक्याबाहेरची गोष्ट होती. हे पाहून वॉटर वर्क्सचा ताबा सरकारने स्वतःकडे ठेवला व नगरपालिकेस कर्जातून मुक्त केले. १९२३ पासून नगरपालिकेस पाणी विकत देण्यास सुरुवात केली. नगरपालिकेच्या पाणी पुरवठयाचा

खर्चउत्पन्नापेक्षा नेहमीच वाढत राहिला. नगरपालिकेने संपूर्ण वॉटर वर्क्स आपल्या ताब्यात घ्यावे अशी मागणी करणारा ठराव केला.

नगरपालिकेची पाणी पुरवठयाची योजना शहराच्या विकासामुळे अपुरी पडू लागल्यामुळे त्यात सुधारणा करणारी दुसरी योजना आखली. पब्लिक हेल्थ इंजिनिअरमार्फत तयार झालेल्या या योजनेत सोमवार पेठेत दीड लाख गॅलन पाण्याची टाकी, जागोजाग नवीन मोठे नळ, खाजगी नळांना मीटर्स या बाबीचा समावेश होता. ही योजना नगरपालिकेने २७.१०.१९४६ रोजी मंजूर केली. पुढे १९४८ साली सदर योजनेचा दुरुस्त अंदाज रु.४,१८,०००/- मंजूर करुन सरकारने खर्चापैकी तिसरा हिस्सा ग्रँट म्हणून व बाकी रक्कम कर्जरुपाने उभारणस पालिकेला परवानगी दिली व १९५० साली ही योजना पूर्ण झाली व शहराच्या सर्व भागात पाणी पुरवठा होऊ लागला.[६४]

१९७१-७२ साली नगरपालिकेस नागरीकांना नळाद्वारे पुरवित असलेल्या पाणी दर उत्पन्न फारच कमी असून नगरपालिकेस एकूण पाणी वितरण व्यवस्था चालविण्यास दरवर्षी ८ लाख इतका तोटा सहन करावा लागला. त्यासाठी पालिकेने वितरण व्यवस्था व वीज बीले भरुन काढण्यासाठी पाणी पट्टी वाढ केली.[६५]

१९७४ साली पाणी पुरवठयात वाढ करण्यासाठी एक लाख गॅलन क्षमतेचा मार्केट यार्ड येथे जलकुंभ बांधणेत आला. अभियांत्रिकी परिसर बांधकाम विभागाने नवीन तयार केलेल्या सुधारित पाणी पुरवठा योजना भाग १ टप्पा १- रु.२,७२,०४,४८५ खर्चून पाणी पुरवठा केंद्र उभारण्यास सुरुवात केली. यामुळे शहराचा पाणी पुरवठा प्रश्न सुटला. योजनेचा भाग-२, टप्पा १- रक्कम रु.१,०२,८७,४२० हाही अभियांत्रिकी विभागाकडून तयार करुन घेऊन कार्यवाहीत आणला. या दोन्ही योजना पूर्ण झाल्याने १९९२ पासून कराड शहरास शुध्द, स्वच्छ,

भरपूर पाणी पुरवठा केला. नव्या सुधारित योजनेची क्षमता १८ दशलक्ष लिटर्स असून पुढे ५० वर्षात कराड शहरास पाणी पुरवठा प्रश्न निर्माण होणार नाही.[६६]

तसेच पाणी पुरवठयात पर्यायी योजना असावी म्हणून सरकारी ठराव क्र.एम.डब्लू.एस./३६७२/७०६७४ दि.१२.१०.१९७२ मध्ये ज.क.ठ.नं. ८/७२ विहीरीतील गाळ काढणे, शहरात ठिकठिकाणी बोअरवेल्स घेण्याची योजना आखली. या योजनेस अंदाजे रु.१,५३,२००/- खर्च आला. तसेच शहरात जागोजागी ५० बोअर मारली. त्यामुळे पाण्याचा प्रश्न हलका झाला.[६७]

**नगरपालिकेची कार्यालयीन इमारत -**

नगरपालिकेच्या कारभाराची सुरुवात चावडीच्या इमारतीत झाली. ती इमारत पडीक असल्याने १८५६ साली नगरपालिकेचे रु.५६८/- खर्च करुन दुरुस्त केली. त्या ठिकाणी १९२८ सालापर्यंत ऑफिस होते. त्या साली ते रविवार पेठ पाण्याच्या टाकीखालील इमारतीत हलविण्यात आले. या इमारतीची मालकी सरकारकडे वार्षिक रु.१२/- नाममात्र भाडे देत. शहराचा वाढता विस्तार होत असल्याने सदर इमारत अपुरी पडू लागली. तेंव्हा सर्व खाती सामावतील अशा प्रशस्त ऑफिस बिल्डींगची नगरपालिकेस जरुरी भासू लागली.[६८]

कार्यालयासाठी स्वतःची प्रशस्त इमारत असावी हा प्रयत्न नगरपालिकेने १९४८ पासून सुरु केला. बुधवार पेठ सि.स.नं.१३० ची सरकारी जागा म्युनिसीपल ऑफिस बिल्डींगकरिता मिळविण्याचे प्रयत्न सुरु केले. १९५४ साली सदर जागा नगरपालिकेच्या ताब्यात आली. इमारत बांधण्यासाठी पैसा उभारण्यासाठी नगरपालिकेच्या मालकीच्या छोटया दोन इमारती उपयोगी नव्हत्या, त्या विकून आलेली रक्कम रु.५३,०००/- इमारत फंड म्हणून राखून ठेवली.

कार्यालयीन इमारत बांधकामास १९५४ मध्ये सुरुवात होवून १९५६ साली पूर्ण झाली. शहराच्या पुढील वाढीच्या दृष्टीने नगरपालिकेच्या विविध खात्यांना पुरेसे असे नकाशे नगराध्यक्ष पी.डी. पाटील यांनी प्रसिध्द वास्तुशिल्पतज्ञ मेसर्स संत घोटींग ॲण्ड डोंगरे, पुणे यांच्याकडून तयार करुन घेतले.

नगरपालिका इमारत तीन मजली असून रचना इंग्रजी एल आकाराची असून मध्यभागी खुल्या नाटयगृहाचा रंगमंच व त्याच्या दोन्ही बाजूस दोन विंग्ज आहेत. या विविध विभागासाठी सभागृह व खोल्या आहेत. तळमजल्यावर जनरल सभेचा मिटींग हॉल आहे व दोन्ही बाजूस विविध खात्याची कार्यालये आहेत. पहिल्या मजल्यावर दहा अशा २० खोल्या आणि ४० फूट बाय २४ आकाराचा जनरल मिटींग हॉल आहे. इमारतीच्या दुस-या मजल्यावर एक हॉल व त्याच्याही वर १० फूट बाय १० अशा आकाराचे चारी बाजूंना दिसणारे भव्य घडयाळ आहे.

इमारतीच्या प्रवेशद्वारी शिव छत्रपतींचा अर्धपुतळा आहे. शहरातील अनेक शैक्षणिक सार्वजनिक संस्थांचे हे जन्मस्थान आहे.[६९]

**मार्केट -**

१८५६ पासून मंगळवार पेठेत दररोजचे मार्केट भरत असे. ही पेठ शहराच्या एका बाजूस असल्याने नागरीकांची फार गैरसोय होत असे. तेंव्हा शहरात मध्यवर्ती ठिकाणी मार्केट असावे म्हणून नगरपालिकेने १८६४ रोजी गुरुवार पेठेतील जागा खरेदी करुन त्या ठिकाणी दोन कट्टे बांधले व झाडे लावली. पाण्याची सोय करण्यासाठी सहा रांजण नगरपालिकेने ठेवले व दरमहा रु.१२/- पगारावर एक भिस्ती नेमला. १९१० साली मार्केटमध्ये सुधारणा करुन मार्केटच्या दोन लाईन्स बांधून १६ स्टॉल्सची सोय

केली. १८९४-९५ मध्ये बांधलेल्या मटण मार्केट गाळे पाडून स्टॉल्स व गाळे एक वर्षाकरिता जाहिर लिलावाने भाडयाने दिली.

नगरपालिकेने १९२८-२९ साली आज असणा-या मंडई मार्केटमध्ये गोल व भव्य इमारतीची आखणी करुन १९३१ साली बांधकाम पूर्ण केले. या इमारतीच्या बांधकामास रु.१९,०००/- खर्च आला. त्या लगतच खाटीस मार्केटची बांधणी १०५८-९-३ रु. खर्च करुन केली. १९४१-४२ साली मंडईमध्ये ४,८९६ चौरस फूटाचे सात कठडे बांधले. १९४९ साली नगरपालिकेने पंधरा हजार रुपये भरुन मंडई पूर्व बाजूची जागा खरेदी करुन साडे पंधरा हजार रुपये खर्चून मंडई मार्केटच्या दक्षिण बाजूस ८३ x २२ ची चाळ बांधली, मच्छी मार्केट मध्ये कट्टे बांधले.[७०]

त्यानंतर १९६२ साली एक प्रशस्त भाजी मार्केट बांधले. १९६८ साली नवीन फीश व मटण मार्केट बांधले. भाजी मार्केट बाहेर बाजूस २३ छोटे गाळे बांधले.[७१]

**कृष्णा नदीवरील पूल -**

१९३९ सालापर्यंत कृष्णा नदीवर पूल नसल्याने वाहतूकीची कुचंबना होत असे. या बाबतीत नगरपालिका आणि तिचे अध्यक्ष खानसो कच्छी यांनी पुढाकार घेऊन १९२९ सालापासून प्रयत्न सुरु केले. नगरपालिकेने १९३१ साली ठराव करुन या कामासाठी रु.४०,०००/- देण्याचे कबूल केले. कृष्णा पुलाच्या बांधकामास १९३५ साली सुरुवात होऊन १९३९ साली पुलाचे उद्‌घाटन नामदार नूरी यांच्या हस्ते झाले. नगरपालिकेने वार्षिक ६००० प्रमाणे एकूण रु.३०,२७२ सरकारला कर्जाऊ दिले.[७२]

याशिवाय बांधकाम विभागाने प्राथमिक शाळा इमारती, शिवाजी स्टेडीयम, लायब्ररी इमारत, प्रितीसंगम इ. वस्तू उभारल्या आहेत.

नगदी विभाग -

बांधकाम विभागाप्रमाणे या विभागालाही अतिशय महत्व आहे. कारण दरवर्षी होणारा खर्च व आगामी वर्षात नगरपालिकेने आखलेले कामासंबंधीचे बजेट ठरवून त्याप्रमाणे पैसा पुरविणे व जमाखर्च ठेवण्याची जबाबदारी या विभागाची असते. या विभागावर देखरेख ठेवण्यासाठीप्रमुख म्हणून अकौंटंट (रोखपाल) यांची नेमणूक केली जाते. याशिवाय इतर ऑडीटर - सिनिअर क्लार्क-३, शिपाई-७ इ. कर्मचारी असतात.[७३]

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ व बॉम्बे म्युनिसीपल ॲक्ट कोड मधील तरतूदीस अनुसरुन अकौंटंट यांनी हिशेबाची सर्व ती जबाबदारी स्वीकारण्याची आहे व त्यासाठी लागणारी रजिस्टर फॉर्म वगैरे ठेवून ते पूर्ण करणेचे आहे. तसेच वार्षिक बजेट व दुरुस्त अंदाजपत्रक, वार्षिक रिपोर्ट तिमाही, सहामाही, नऊमाही, बारमाही हिशेब तयार करुन त्याची मुदतीत प्रसिध्दी करणे, हाताखालील नोकर वर्गाकडे कामाची वाटणी करुन देणे व त्याप्रमाणे काम पूर्ण करुन घेणे.

कॅशिअर -

१. रोजची जमा घेणे

२. मंजूर बिलाप्रमाणे रक्कमा अदा करणे

३. जमा खतावणी लिहिणे

४. जमेचा भरणा बँकेत रोजचे रोज भरणे

५. डिपॉझीट- ॲडव्हान्स वगैरे सर्व रजिस्टर्स अद्यावत लिहिणे इ. कामे त्यास पार पाडावी लागतात.[७४]

**सामान्य प्रशासन विभाग -**

या विभागाकडे प्रमुख लिपीक-१, वरिष्ठ लिपीक-२, लिपीक-७, शिपाई-५, ड्रायव्हर-१, वॉचमन-४ असे २० कर्मचारी असतात.[७५]

**वरिष्ठ लिपीक -**

जनरल कमेटीचा अजेंडा काढणे, कमेटीला हजर राहणे, विषयाच्यासूचना लिहिणे, ऑफिस इन्स्पेक्शनचे प्रश्नावली उत्तरे तयार करणे, ऑडिट नोटची उत्तरे तयार करणे, त्या संबंधीचा सर्व पत्रव्यवहार पाहणे, सर्व कार्यालयाची ए.पी.आर. रजिस्टर ठेवणे, दर सोमवारी सर्वांचे वर्कशीटस, डाय-या तपासणे, मा. जिल्हाधिकारी अगर वरिष्ठ सरकारी अंमलदार याचेशी करणेचा महत्वाचा पत्रव्यवहार पाहणे, दुरुस्त करणे, कोणत्याही खात्याचे प्रपोजल मसुदे तयार करणे, ऑपनीस वॉचमन कामावर नियंत्रण ठेवणे.

**मिटींग क्लार्क -**

सब कमेटयांचे अजेंडे तयार करुन पाठविणे, सर्व सब कमेटयांना हजर राहणे, प्रोसिडींग लिहिणे, दप्तरी शेरे मारुन कामे ज्यांची त्यास देणे.[७६]

**स्टोअर विभाग -**

या विभागात १ स्टोअर किपर, १ सिनिअर क्लार्क, १ लिपीक, ३ शिपाई, १ वॉचमन, २ वायरमन, एकूण ९ कर्मचारी असतात.[७७]

**स्टोअर क्लार्क -**

ताब्यात असणा-या सर्व मालाचा हिशेब ठेवणे, नवीन इलेक्ट्रीक लाईन टाकणे, त्यासंबंधी पॉवर हौसशी पत्रव्यवहार करुन कामाची पूर्तता करणे, नगरपालिका

कार्यालय इतर इमारती व स्ट्रीट लाईटसची बिले कमेटीकडे पाठवणे, जुने निरुपयोगी सामान लिलावात काढणे.

**दप्तरखाना -**

रेकॉर्ड क्लार्क- सर्व विभागातील कोरी बुक, रजिस्टरे, फॉर्म्स यांची छपाई करणे, पावती बुके, रजिस्टरे, सर्व खात्यास पुरविणे, सर्व कर्मचा-यांना लागणारे सादील आणणे व पुरविणे, सरकारने ठरविलेल्या पध्दतीप्रमाणे रेकॉर्ड लावणे व नाशवंत रेकॉर्ड नियमाप्रमाणे नाश करणे.[७८]

**कर वसुली विभाग -**

या विभागात कर वसुली प्रमुख-१, लिपीक-९, शिपाई-६ असा १६ कर्मचारी वर्ग असतो.[७९]

**कर वसुली प्रमुख -**

कर वसुलीबाबत बिले, नोटीसा, पेठ क्लार्क नियमाने काढतात की नाही यावर देखरेख करणे, म्युनिसीपल मिळकती लिलावाने देणेची व्यवस्था करणे, वर्ष अखेरची डिमांड रजिस्टर जमविण्यास पेठ क्लार्कना सहाय्य करणे, कोंडवाडा अटेंडंटचे कामावर देखरेख ठेवणे, जनरल कीर्द स्वतः रोजचे रोज लिहिणे, खात्याचा पत्रव्यवहार पहाणे इ. कामे पहावी लागतात.[८०]

**भेसळ प्रतिबंधक -**

अन्न निरीक्षक-१, लिपीक-१, शिपाई-१ असे कर्मचारी असतात.[८१]

अन्न निरीक्षक -

भेसळ प्रतिबंधक कायदा व त्या खालील नियमानुसार सदर कायद्याची शहरात तंतोतंत व कार्यक्षमतेने अंमलबजावणी करणे, गुन्हेगारांना उजेडात आणून त्यांच्यावर

मुदतीत खटले भरणे, भेसळ प्रतिबंधक खाद्यपेय, जिन्नस यात होणारी भेसळ शोधून काढणे व अशा प्रवृत्तीस आळा घालणे, हॉटेल लायसेन्स, हातगाडी लायसेन्स व तपकीर लायसेन्स बाबत योग्य ती अंमलबजावणी करणे, भाजी मार्केट, मटण मार्केट तपासणी करणे."[८२]

या व्यतिरिक्त ग्रंथालय, जकात, पाणी पुरवठा अग्निशामक, मार्केट इ. विभागातील सर्व कर्मचा-यांना त्या विभागातील ठरवून दिलेली काम पार पाडावी लागतात.

**वेतनश्रेणी -**

बॉम्बे म्युनिसीपल बरोज अॅक्टने घालून दिलेली नि नगरपालिकेचे जनरल बोर्ड व सब कमेटयांनी ठरविलेली कामे पार पाडण्यासाठी नगरपालिकेचा बराच मोठा नोकर वर्ग आहे.

नगरपालिका स्थापन झाली तेंव्हा लिखाण व हिशेब ठेवण्यासाठी मासिक ५ रु. पगारावर कारकून नेमला. २ मेस्त्री रस्ते व गटार दुरुस्तीसाठी दरमहा रु.१० पगारावर नेमले व दोन पट्टेवाले २ रु. ८ आणे पगारावर तसेच ४ भंगी दरमहा ३ रु. पगारावर रस्ते सफाईसाठी ठेवले.

हळूहळू जसजशी महागाई वाढत गेली, तस तशी कर्मचा-यांची वेतनश्रेणी वाढत गेली. महागाई वाढल्यामुळे म्युनिसीपल नोकर वर्गास १९४६-४७ पासून सरकारी दराने महागाई भत्ता मिळण्यास सुरुवात झाली. नगरपालिकेने त्यांच्या पगाराचे मानही १९४८ साली वाढविले."[८४]

म्युनिसीपल नोकराच्या महागाई भत्यासंबंधी मुंबई सरकारचा ठराव नं.सी.पी.ए. १७५७/आय/६ व सी.पी.ए. १७५७ ॥/ ९६ ता. १७.५.१९५७ चा

ऑफिस रिपोर्टनुसार दरमहा रु.५०/- पर्यंत पगार असणा-या सर्व म्युनिसीपल नोकरांना मिळणारा महागाई भत्ता १९५८ पासून ४० रु. वाढविण्यास मंजूरी दिली.[८४]

तक्ता

| क्र. | तपशील | | जागा वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १. | हेड क्लार्क | - | १७०-३०-२३०-२७६० |
| २. | मिटींग क्लार्क | - | १५५-२१५-१८०-२१६० |
| ३. | ग्रंथपाल | - | १५०-२७०-२६०-३१२० |
| ४. | जकात सुपरिटेंडंट | - | १७०-३००-२८५-३४२० |
| ५. | आरोग्य- सॅनीटरी इन्स्पेक्टर | - | ४५०-२९९- ७४९ |
| ६. | बांधकाम इंजिनिअर | - | ६४०-४०० १० पै.१०४०-१० पै. |
| ७. | बिल्डींग इन्स्पेक्टर | - | ४५०-२९९-७४९ |
| ८. | नगदी क्लार्क | - | १५०-३००-१७५-२१०० |

वरीलप्रमाणे सन १९७३-७४ साली पगार दिला जात होता.[८५]

दि.१६.६.१९७० च्या शिफारशी सादर केल्या, त्या पहिल्या बडकस आयोगाच्या अहवालास अनुसरुन नगरपालिकेच्या सेवक वर्गास ता.१.४.१९६६ पासून मा. संचालक यांच्या रितसर मंजूरीनंतर सुधारित वेतनश्रेणी महाराष्ट्र सिव्हील सर्व्हिसेस (रिव्हीजन ऑफ पे) रुल्स, १९६९ मधील तरतूदीप्रमाणे निश्चित करणेत आली.[८६]

यानंतर १९७६, १९८६ वेतनश्रेणीत बदल करणेत आले.[८७]

सन १९६६ ला बडकस वेतनश्रेणी सन १९७६ मध्ये भोळे वेतनश्रेणी, तर सन १९८६ मध्ये चौथे वेतन आयोग यांच्या शिफारशीप्रमाणे वेतनश्रेणी मान्य करणेत आली.

**कर्मचा-यांना पुरविलेल्या इतर सुविधा -**

कराड नगरपालिकेने आपल्या कर्मचारी वर्गाला चांगल्या सुविधा सुरुवातीपासूनच पुरविल्या आहेत. त्या खालील गोष्टीवरुन पहाता येतील -

१. रजा - कर्मचारी वर्गाच्या अडीअडचणी व आजारपणी किंवा घरगुती कामासाठी रजा काढली जाते. सन १९४८ मध्ये नोकरांना एकंदर १४ रजा दिल्या जात होत्या. त्यामध्ये वाढ करणेत येऊन वर्षाला एकूण ७० रजा मिळतात. १२ दिवस किरकोळ रजा, ३० दिवस हक्काची रजा, २० दिवस मेडीकल रजा कर्मचा-यांना दिल्या जातात.[८८]

प्रॉव्हीडंट फंड -

नगरपालिकेच्या नोकर वर्गास आर्थिक सहाय्य व्हावे यासाठी नगरपालिकेने ता.१.८.१९३८ पासून प्रॉव्हीडंट फंडाचे नियम अंमलात आणून त्याप्रमाणे बचत योजना सुरु केली.[८९]

संबंधित कर्मचा-यांच्या खात्यामध्ये जमा असलेल्या रक्कमेपैकी ५० टक्के रक्कम कर्ज दिले जाते, ज्या कर्मचा-यांची सेवा २० वर्षापेक्षा जास्त झाली असेल त्या कर्मचा-यांना त्यांच्या मागणीप्रमाणे ७५ टक्के ना परतावा रक्कम स्थायी समितीची मंजूरी घेऊन अदा करता येते.[९०] उदा. श्री बापू ज्योती कटारे यांनी इन आ.नं. ११५५ अर्जाने प्रॉव्हीडंट फंडाची मागणी केली.

| | | |
|---|---|---|
| व्याजासह वर्गणी | - | २१५-३५ |
| बोर्डाची व्याजासह वर्गणी | - | ३३१-३८ |
| | एकूण रक्कम- | ५४६-७३ |

१०० रु. ॲडव्हान्स दिली ती कापून घेतली.

**राहणेसाठी जागा -**

प्रत्येक व्यक्तीच्या मुलभूत गरजांमधील निवारा ही अत्यंत महत्वाची गरज आहे. या गोष्टीकडे कराड नगरपालिकेनेही लक्ष पुरविलेले दिसून येते.

स्वीपर्स हौसिंग स्कीम अनुसार नगरपालिका स्वीपर्स लोकांकरिता बांधावयाच्या क्वॉर्टर्सचे प्लॅन्स व एस्टीमेट रक्कम रु.३६,४५० मे. एक्झीक्युटीव्ह इंजिनिअर उ. सातारा यांनी आपले नं.डीबी/११०/२५२१३ दि.२०.११.१९६० ने मान्यता दिली. तरी स्वीपर्स हौसिंग स्कीमसाठी सरकारकडून रक्कम रु.१७,६०० चे कर्ज व रक्कम रु.८,८०० सबसीडी मागणी करणेत आली.[११] त्यानुसार स्वीपर्स हौसिंग सोसायटी स्थापन करण्यात आली. १९६९-७० च्या बजेटमध्ये यासाठी रु.३०,०००/- तरतूद करण्यात आली. तसेच नगरपालिकेच्या टाऊन प्लॅनिंग स्कीम नं.१ मधील पश्चिमेकडील जागा चतुर्श्रेणी कामगारांना देण्याचा प्रयत्न १९८३-८४ साली केला. ज्यांची घरे नादुरुस्त आहेत त्यांना दुरुस्तीसाठी नगरपालिकेकडून कर्ज मिळण्याची तरतूद केली.[१२]

**गणवेश -**

नगरपालिकेने सेवक वर्गास द्यावयाच्या गणवेशाबाबत तयार करणेत आलेल्या पोट कानूचा मसुदा स्थायी समिती ठराव क्रमांक २६/४१८, ता. १६.८.१९६९ ने

शिफारस होऊन आला. प्रत्येक विभागातील कर्मचा-यांना पुढीलप्रमाणे गणवेश दिला जातो-

१. पाणी पुरवठा विभाग- पांढ-या रंगाचे बुशकोट व पँटस, प्रत्येकी दोन पांढ-या टोप्या.

२. आरोगय विभाग - पांढ-या रंगाचे दोन बुशकोट, दोन फूल पँटस.

३. मोटर ड्रायव्हर - आरोग्य व बांधकाम - खाकी कापडाचे दोन शर्ट व दोन पँट, दोन टोप्या, पाणी पुरवठा ड्रायव्हर- निळया रंगाचा गणवेश.

४. सर्व खाते शिपाई- खाकी दोन शर्ट व पँट

५. आरोग्य विभाग - स्त्री सेवक- दोन सुती निळया नऊवारी साडी, दोन पोलकी

६. भंगी - पावसाळा गोणपाट बुट, घोंगडी

**अशा प्रकारचा गणवेश नगरपालिका कर्मचा-यांना दिला जातो.''**

**कराड नगरपालिका सेवकांची सहकारी पत संस्था -**

स्थापना -

दुसरे जागतिक महायुध्दाचे परिणामामुळे वस्तूचे भाव वाढले. त्यामुळे नगरपालिकेचा अल्प वेतन मिळणारा सेवक वर्ग कर्जबाजारी होऊ लागला. उधार, उसनवारी पध्दत बंद पडली तेंव्हा लग्नकार्य, औषधपाणी यासाठी कर्ज मिळेनासे झाले.

अशा बिकट परिस्थितीतून निभावून निघण्याचा मार्ग जनरल डिपार्टमेंट, मुंबई राज्य यांचेकडील निवेदन परिपत्रक नं. २८६२/३३ ए- ता. २९.४.१९४१ मध्ये म्युनिसीपल नोकरांनी सहकारी पत संस्था सुरु करणेची योजना आखण्यासाठी म्युनिसीपल नोकर वर्गातील पंधरा जणांनी एकत्र येवून मेमोरँडमसह स्वीकारुन

सोसायटी नोंदणीसाठी प्रपोजल १४.४.१९४२ रोजी मे. रजिस्ट्रार, को-ऑपरेटीव्ह सोसायटी, पुणे यांचेकडे पाठवले. त्यानंतर मे. असिस्टंट रजिस्ट्रार को-ऑपरेटीव्ह सोसायटी, बेळगाव यांचेकडे पाठवले. त्यांनी १९२५ बॉम्बे ॲक्ट ७ चा सेक्शन १० अन्वये 'कराड म्युनिसीपल सर्व्हंटस को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी लिमिटेड' कराड तालुका, कराड, जि. सातारा, या नावाने नोंद केल्याचे जाहीर केले.

कराड म्युनिसीपल ॲडमिनिस्ट्रेटर रावसाहेब भीमराव बळवंतराव माळवे व एक्झीक्युटीव्ह ऑफिसर श्री अनंत सखाराम विद्वांस या व्यक्तींनी म्युनिसीपल नोकर वर्गाचा आर्थिक प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने परिश्रमपूर्वक ही पगारदार नोकराची सोसायटी स्थापन करुन शासनात नोंदवली.[१४]

कार्यारंभ -

सोसायटीची पहिली सर्वसाधारण सभा तारीख १४.२.१९४३ रोजी श्री भिमराव बळवंत माळवे यांचे अध्यक्षतेखाली भरली. त्यावेळी १५ प्रमोटर्सपैकी ११ जण सभेस हजर होते.

कार्यक्षेत्र -

नगरपालिकेच्या सेवक वर्गाच्या अडीअडचणी जाणून जे संस्थेचे सभासद झाले असतील त्यांना कर्ज देणे, त्यांची मासिक हप्त्याने वसूली करणे.[१५]

उद्देश -

१. काटकसर करणेस सभासदांना उत्तेजन देणे.

२. रास्त अटींवर कर्ज पुरवठा करुन पत संस्थेच्या सभासदांचा कर्जबाजारीपणा नाहीसा करणे.

भांडवल -

सभासदाकडून खालील साधनांनी भांडवल उभारले गेले ?

१. वर्गणी २. शेअर्स ३. ठेवी

४. कर्जाच्या माध्यमातून ५. देणगी ६. प्रवेश

पतसंस्थेचे सभासदत्व -

म्युनिसीपल नोकरीत असणारी व्यक्तीच सोसायटीचा सभासद असू शकते. सुरुवातीस प्रत्येकी फी रु.१/- एक महिन्याची वर्गणी भरुन सभासद होता येते. याशिवाय कर्ज मिळण्यासाठी दि बॉम्बे को-ऑपरेटीव्ह इन्शुरन्स सोसायटी लि., मुंबई या विमा कंपनीचा स्वतःच्या आयुष्याचा विमा उतरावा लागे.

पतसंस्थेचे अध्यक्ष -

१. अनंत सखाराम विद्वांस - १९४२-१९४६

२. दत्तात्रय वासुदेव कुमठेकर - १९४६-४९- १९५०-५१

३. जगन्नाथ भाऊ जाधव - १९४९-५०- १९५४-७६

४. श्रीपाद रामचंद्र देशपांडे - १९५१-५२

५. श्री वसंत तुकाराम वेल्हाळ - १९५२-५३

६. दत्तात्रय व्यंकटेश जोशी - १९५३-५४

७. श्री आप्पा किसन पवार - १९७६-७९

८. श्री केशवराव बाबूराव मोहिते - १९८०-८१

९. श्री एकनाथ शिवराम भोसले - १९७९-८०

१०. श्री वसंत तुकाराम वेल्हाळ - १९८१-८२

११. श्री मुरलीधर बाळकृष्ण काटवटे - १९८२-८४

१२. श्री चांद महंमद शेख - १९८४-८५

१३. श्री भिमराव जगन्नाथ तवर - १९८५-८६

१४. श्री भिकाजी रामचंद्र मुळे - ५.१२.१९८५- ३१.३-.१९८७

१५. श्री भिमराव खाशाबा पवार - १९८६-८७

१६. महादेव गुजाबा घाडगे - १९८७-८८

१७. अशोक पुरुषोत्तम घाडगे - १९८८-८९

१८. किसन बाबूराव पाटील - १९८९-९०

१९. आनंदा निवृत्ती पाटील - १९९०-९१

२०. श्री प्रकाश आत्माराम कारंडे - १९९१-९२

२१. श्री महादेव गुजाबा घाडगे - १९९२-९३

कर्ज वितरण नियम -

कर्जदार सभासदाच्या स्वतःच्या हमीवर व सभासद असणा-या दुस-या दोन जामीनदारांच्या जबाबदारीवर अगर बोजा नसलेल्या स्थावर मिळकतीवर तारण घेऊन वर्गणीची जेवढी रक्कम सभासदांच्या नावाने जमा असेल तिच्या जोखमीवर कर्ज फिटेल एवढी अधिकृत किंमत असणा-या इन्शुरन्स पॉलिसीच्या गहाणावर ही कर्जाची रक्कम १०० रु. पेक्षा कमी अथवा सभासदाच्या ३ महिन्याच्या पगाराच्या रक्कमेइतकी, यात जी रक्कम अधिक असेल ती द्यावी. काही वर्षानंतर दोन जामीनदारांच्या

जबाबदारीवर व शेअरच्या पगाराच्या पटीवर कर्जे देण्याची मर्यादा रु.३,५००/- पर्यंत गेली. १९७८ नंतर कर्ज देण्याची मर्यादा रु.३,५००/- पर्यंत गेली.

व्याजाचा दर -

सुरुवातीस दिलेल्या कर्जावरील व्याजाचा दर दरमहा दर शेकडा १२ १/२ आणे होता. १९५९ रोजी दशमान पध्दत अंमलात आणून तो दरमहा दर शेकडा ८० नये पैसा केला. हाच दर अद्याप चालू आहे.

सोसायटीने केलेल्या कर्ज व्यवहारातील प्रगतीपत्रक -

| अ. नं. | वर्ष | कर्जदार सभासद | दिलेले कर्ज | कर्जावर मिळालेले व्याज | कर्जाची येणे बाकी |
|---|---|---|---|---|---|
| १. | १९४४-४५ | ४६ | १,०६४ | ६९ | ६९४ |
| २. | १९४८-४९ | ५८ | ४,५११ | २०४ | २,२८७ |
| ३. | १९५४-५५ | ८४ | २५,१४१ | १,०५६ | १२,०७२ |
| ४. | १९६२-६३ | ९५ | ६३,७९५ | ४,३११ | ४९,३४१ |
| ५. | १९६७-६८ | १२१ | १,३३,५०० | ९,११० | १,००,४७० |
| ६. | १९७२-७३ | १२८ | २,३५,९५० | १४,८९४ | १,५८,६७५ |
| ७. | १९७७-७८ | १३२ | ३,६७,५६५ | २२,५३३ | २,५०,२४० |
| ८. | १९८२-८३ | १४३ | ७,४८,९०० | ४०,२९८ | ४,४०,१३५ |
| ९. | १९९१-९२ | १९४ | २३,५३,३५० | १,४३,१४३ | १५,११,०५० |

पत संस्था उत्पन्न व खर्च -

| अ. नं. | वर्ष | उत्पन्न | खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १. | १९४४-४५ | ११ | - | ११ |
| २. | १९५४-५५ | १,१०८ | २६९ | ८३९ |
| ३. | १९६७-६८ | ९,३१७ | १,४९२ | ७,८२५ |
| ४. | १९७७-७८ | २३,८१३ | २,९९७५ | २०,८१६ |
| ५. | १९८२-८३ | ४३,३०२ | ७,०५४ | ३६,२४८ |
| ६. | १९९१-९२ | १,५७,१६५ | २९,६२८ | १,२७,५३७ |

नफा वाटणी -

पोट नियमाप्रमाणे नफ्याची वाटणी खालीलप्रमाणे -

१. रिझर्व्ह फंड नफ्याच्या २५ टक्के

२. डिव्हीडंड बोनससह शेअरच्या ७ $^{1}/_{2}$ पेक्षा जास्त नाही.

३. डिव्हीडंड इक्वीलायझेशन फंड शेअरच्या १ टक्के प्रमाणे

तसेच राहिलेल्या रक्कमेचा विनियोग खालीलप्रमाणे -

१. कर्जदारांना बोनस - ५०%

२. नोकरांना बोनस - १०%

३. सहकार शिक्षण प्रसार निधी - १०%

४. सर्वसाधारण सभेच्या मर्जीनुसार - ३०%

अशा प्रकारे सेवक सहकारी पत संस्थेने केवळ आर्थिक नफा तोटा पाहून व्यवहार करणारी कर्मठ सहकारी संस्था नाही, लोकशाही समाजवादी समाज रचनेचा आग्रह धरुन समाज परिवर्तन व सदस्यांचे प्रबोध करणारी एक सामाजिक संस्था बनली आहे.[१६]

**महिला व बालकल्याण योजना -**

नेहरु रोजगार योजनेअंतर्गत महिलांसाठी रोजगार योजनांचा कार्यक्रम चालविणे, आर्थिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात स्त्री-पुरुष समानता स्थापन करुन महिलांना विकासाची संधी मिळवून देणे, प्रतिष्ठा प्राप्त करुन देणे, यासाठी महाराष्ट्र शासनाने जून १९९३ पासून महिला व बालकल्याण विभाग स्थापन केला. शासनाच्या या योजना व उपक्रम यशस्वीपणे राबविणेचे अतिशय महत्वाचे काम कराड नगरपालिकेनेही केलेले आहे. त्यासाठी पुढील उपक्रम राबविले -

१. नेहरु रोजगार योजनेअंतर्गत महिलांसाठी रोजगार कार्यक्रम चालविणे.

२. लहान मुलांसाठी सकस अन्न पुरवठा

३. प्रौढ शिक्षण साक्षरता मोहीम

४. माता बाल संगोपनाबाबत लोकशिक्षण व माहिती.[१७]

एकंदरीत या प्रकरणामध्ये थोडक्यात कराड नगरपालिकेची स्थापना कशी झाली, तसेच त्तपूर्वी स्थानिक स्वराज्य संस्थांचा प्राचीन काळापासून कसकसा विकास होत आला, त्यामध्ये इंग्रजांनी केलेल्या सुधारणांचा धावता आढावा घेतला आहे. कराड नगरपालिकेच्या विकासाचा आढावा घेतल्यानंतर आपल्या असे निदर्शनास येते की, साधारणतः कराड नगरपालिकेच्या विकासाचे १२ टप्पे पडतात, या प्रत्येक टप्यात नगरपालिका रचना व कायद्यात बदल झालेले आहेत. १८५५ ते १९९३ या पर्वात

नगरपालिकेचा विकास झालेला दिसतो. १९४८ ते १९९३ या पर्वात पूर्णपणे लोकशाहीकरण प्रक्रियेला प्रारंभ होऊन नगरपालिकेने विकासाची कामे करुन उच्च शिखर गाठले.

त्याप्रमाणे विकासाबरोबर प्रशासनाचा विचार करता असे म्हणता येईल की कराड नगरपालिकेचे प्रशासन प्रभावी आहे आणि त्यामुळे तिचा विकास झालेला दिसतो. तसेच तीचे उत्पन्नही वाढलेले दिसते. जर प्रशासन चांगले व कोटेकोर असेल तरच प्रगती होऊ शकते. प्रशासनाचा अभ्यास केल्यावरुन असे दिसून येते की नगरपालिका प्रशासनात काही अंशी दोषयुक्त बाजूही असतील. उदा. भ्रष्टाचार, कामचुकारपणा तरीही परिष्टाच्याकडून यांच्यावर आळा घालून तसेच नागरीकांनी जाणीवपूर्वक त्यांना साथ देऊन जास्तीत जास्त आपली सोय आणि सुविधा करुन घेणे गरजेचे आहे.

# संदर्भ


१. शर्मा एन.पी - लोकल सेल्फ गव्हर्मेंट इन इंडिया, पृ. ८.

२. सचदेव डी.आर. - स्टडीज इन इंडियन अ‍ॅडमीनिस्ट्रेशन, पृ. ३५७.

३. रायचंद्र एस.सी. - हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. २१३.

४. महेश्वरी एस.आर. - लोकल गव्हर्मेंट इन इंडिया, पृ. ११४.

५. रायचंद्र एस. सी. - हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. २१३.

६. कित्ता - पृ. २१३.

७. कित्ता - पृ. २१४.

८. छाबरा जी.एस. - अ‍ॅडव्हान्सड स्टडी इन दि हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड-२, पृ. ४७१.

९. रॉयचंद्र एस.सी. - हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. २१४.

१०. छाबरा जी.एस. - अ‍ॅडव्हान्सड स्टडी इन हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, खंड २, पृ. ४७१.

११. लीन्डस जे.एच. - केंब्रीज हिस्ट्री ऑफ इंडिया, खंड ६, पृ. ५२१.

१२. छाबरा जी.एस. - अ‍ॅडव्हान्सड स्टडी इन हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ.४७२.

१३. पाटील अ.आ. - आधुनिक भारत, राविले पब्लिकेशन, पृ.११८.

१४. रायचंद्र एस.सी. - हिस्ट्री ऑफ मॉडर्न इंडिया, पृ. २१९.

१५. पाटील पी.डी., संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. १७, १८.

१६. कित्ता - पृ. १९, २७.

१७. कित्ता - पृ. ३२, ३३

१८. कित्ता - पृ. ३९, ४०

१९. कित्ता - पृ. ४६,४७,४८,४९

२०. कित्ता - पृ. ५३,५४,५५,५६,५७

२१. कित्ता - पृ. ६५

२२. ढवळे न.वा. - दै. सकाळ लेख- कात्रण, १८ डिसेंबर, १९९२

२३. पाटील पी.डी. संपादक - कराडनगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. ६६.

२४. कित्ता, पृ. ७२,७३,७४

२५. कित्ता, पृ. ७९, ८०, ८१

२६. कित्ता, पृ. ८९,९०,९१

२७. कित्ता, पृ. ९६,९७,९८

२८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो.बुक १९५७-५८

२९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो.बुक १९६५-६६

३०. जोशी व.श., कायमखाने लिला - महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, पृ.२२.

३१. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९५६-५७.

३२. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९६२-६३.

३३. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९६६-६७.

३४. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९७४-७५.

३५. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९८५-८६.

३६. कराड नगरपालिका रेकॉर्ड, ज.प्रो. बुक १९९०-९१.

३७. जोशी व.श., कायमखाने लिला - महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, पृ.५७.

३८. डॉ. राजशेखर ए.एम. - इन्लमेंट ऑफ गव्हर्मेंट, पृ. १३५.

३९. टेड आर्ड वे - ॲडमीनिस्ट्रेशन इटस प्रपोजल ॲण्ड प्रेफरन्स, पृ. ६७.

४०. हेरमन किनेर - द ब्रिटीश सिव्हील सर्व्हीस पे. पृ.५.

४१. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांतत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५, १९५५ पृ. २१,३४,३५,५९,६९,७५,११३,११४,११५.

४२. जोशी व.श.,कायमखाने लिला - महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, पृ. २४,४५,१६०.

४३. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मुख्याधिकारी बोर्ड.

४४. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५ पृ. २३,२९,४२,६४,८४,११९.

४५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९५५-५६.

४६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

४७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९५८-५९.

४८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७९-८०.

४९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

५०. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक समृती ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ.२४.

५१. कराड नगरपालिका रेकॉर्ड - पगार नोंदपत्रक फाईल १९९२-९३.

५२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल

५३. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, पृ. २४,३०,६४,८५,९५,१०२,१२१.

५४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७६-७७ ठराव नं.५/४०

५५. कराड नगरपालिका मिटींग वृत्तांत - १४ सप्टेंबर, १९९३

५६. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, पृ. ६७, १२३.

५७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९४०.

५८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९५५.

५९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९६४.

६०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

६१. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. २३,२८,३६.

६२. ढवळे न.वा. दै. सकाळ लेख - कात्रण - १८ डिसेंबर, १९९२.

६३. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, पृ. ७०,७६,७९.

६४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७१-७२.

६५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

६६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९७३-७४.

६७. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. २१, ७४.

६८. ढवळे न.वा. दै. सकाळ लेख - कात्रण - दि. ३.१.१९९३.

६९. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. २६,३०,७१,८५,९५,१०३.

७०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - मिटींग वृत्तांत १४ सप्टेंबर, १९९३.

७१. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. ८६.

७२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - वेतन नोंद फाईल.

७३. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

७४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - वेतन नोंद फाईल.

७५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

७६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - वेतन नोंद फाईल.

७७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

७८. कराड नगरपालिका रेकॉर्ड - वेतन नोंद फाईल.

७९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

८०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - वेतन नोंद फाईल.

८१. कराड नगरपालिका रेकॉर्ड - डयुटी लिस्ट फाईल.

८२. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५, पृ. २२,९८.

८३. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक, १९५८.

८४. कराड नगरपालिका रेकॉर्ड - पगारपत्रक फाईल, १९७३-७४.

८५. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक, १९६९-७०.

८६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक, १९८६-८७.

८७. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक, १९७०-७१.

८८. पाटील पी.डी. संपादक - कराड नगरपालिका शतसांवत्सारिक स्मृती ग्रंथ, १८५५-१९५५.

८९. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९८६-८७.

९०. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९६०.

९१. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९८३-८४.

९२. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज.प्रो. बुक १९६९-७०, ठराव २६/४१८ १९६७-७०.

९३. कराड नगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था, कराड - सुवर्णमहोत्सव स्मरणिका, १९९३-९४, पृ. ३.

९४. कराड नगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था - २७ वा अहवाल, १९६८-६९.

९५. कराड नगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था, कराड - सुवर्णमहोत्सव स्मरणिका, १९९३-९४ पृ- ५, ७, ११, १३, १७, १९, २१, २३, ३५.

९६. कराड नगरपालिका रेकॉर्ड - ज. प्रो. बुक १९९२-९३.